cmyk



दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

घटस्थापना

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१६५ | रविवार, दि.६ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

# राज्यात सोयाबीन, मुग अन् उडदाची हमीभावाने खरेदी

## १० ऑक्टोबरपासून खरेदीला सुरूवात, २०९ केंद्रावर केली जाणार व्यवस्था

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात सोयाबीन, मुग उडीद खरेदीसाठी नाफेड आणि एनसीसीएफने २०९ हमीभाव खरेदी केंद्रांना मंजूर दिली आहे. राज्यातील १९ जिल्ह्यात नाफेडची १९ खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. तर एनसीसीएफची ७ जिल्ह्यांमध्ये ६३ खरेदी केंद्र मंजूर करण्यात आली आहेत. या खरेदी केंद्रांवर १० ऑक्टोबरपासून मुग आणि उडीद तर १५ ऑक्टोबरपासून सोयाबीनची हमीभावा खरेदी सुरू करण्यात येणार आहे.**



केंद्र सरकार २०२४-२५ च्या हंमामात सोयाबीन, मुग आणि उडीद या पिकांची हमीभावाने खरेदी करणार आहे. नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून ही खरेदी केली जाणार आहे. त्यासाठी राज्य सरकारने नियुक्त केलेल्या या दोन्ही नोडल एजन्सीना आदेश दिले होते. या एजन्सीच्या माध्यमातून १३ लाख टन सोयाबीन, १७ हजार टन मुग आणि १ लाख ८ हजार टन उडीदाची हमीभावाने खरेदी करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी सोयाबीन, मुग उडीद हमीभाव खरेदीचा लाभ घेण्याचे आवाहन मार्केट फेडरेशनने केले आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या नाफेड आणि एनसीसीएफच्या खरेदी केंद्रावर जाऊन नोंदणी करावी. नोंदणीसाठी ७/१२, आधारकार्ड आणि बँकेचे पासबुक आवश्यक आहे. नोंदणी केल्यानंतर शेतकऱ्यांना मोबाईल शेतमाल विक्रीसाठी ◀◀ पान २ वर

### » बीडमध्ये सर्वाधीक १६ खरेदी केंद्र

राज्यातील १९ जिल्ह्यात नाफेड तर एनसीसीएफचे ६३ खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार आहेत. नाफेडचे सर्वाधिक १६ खरेदी केंद्र कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या बीड जिल्ह्यात सुरू करण्यात येणार आहेत. तर एनसीसीएफचे सर्वाधिक नांदेड जिल्ह्यात १४ खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार आहेत.

### » नाफेड खरेदी केंद्र

अकोला ९, अमरावती ८, बीड १६, बुलढाणा १२, धाराशिव १५, धुळे ५, जळगाव १४, जालना ११, कोल्हापूर १, लातूर १४, नागपूर ८, नंदुरबार २, परभणी ८, पुणे १, सांगली २, सातारा १, वर्धा ८, वाशिम ५ आणि यवतमाळ जिल्ह्यात ७ हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार आहेत.

### » एनसीसीएफचे खरेदी केंद्र

एनसीसीएफचे नाशिक जिल्ह्यात ६ अहमदनगर ७, सोलापूर ११, छत्रपती ११, हिंगोली ९, चंद्रपुर ५ आणि नांदेड १४ हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात येणार आहेत.

# मनोज जरांगे यांच्या मागणीवर तोडगा काढा !

## मंत्री रामदास आठवले यांचा महायुती सरकारला सल्ला

**बीड । प्रतिनिधी**

केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे पाटील यांच्या आरक्षणाच्या मागणीवर महत्वाचे वक्तव्य केले आहे. मनोज जरांगे पाटील यांची आरक्षणाची मागणी योग्यच आहे. आम्ही त्यांच्या सोबत आहोत. मनोज जरांगे यांनी मराठा समाज खडबडून जागा केला आहे. त्यांच्या मागणीवर सरकारने वेळीच तोडगा काढावा. परंतु, ओबीसी समाजावरही अन्याय होऊ नये, याची काळजी ◀◀ पान २ वर



### केजमधून पप्पू कागदेच आमदार होणार

आम्हाला जास्त नको; पण आमच्या ताकदीप्रमाणे राज्यातील सत्तेत वाटा हवा आहे. विधानसभेच्या २०१९ च्या निवडणुकीवेळी केज मतदारसंघ रिपाइंला सुटला होता. मात्र, ऐनवेळी भाजपने उमेदवार बदलला. आता यावेळी केज मतदारसंघावर आमचा अधिकार आहे. ही जागा आम्हाला भेटली तर पप्पू कागदे हेच उमेदवार असतील आणि तेच तेथील आमदार होणार असा दावा मंत्री रामदार आठवले यांनी केला.

### आज मोंढा रोडच्या कामाचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते उद्‌घाटन

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसापासून मोंढा रोडचे काम रखडले होते .जालना रोड ते बिंदुसरा पुलापर्यंत चे काम रखडल्याने हा रस्ता अत्यंत खराब झाला होता. या रस्त्याच्या कामाला अमर नाईकवाडे यांच्या प्रयत्नातून मुहूर्त लागला असून आज सायंकाळी ५:३० वाजता या रस्त्याचे उद्धाटन होणार आहे. गेल्या अनेक दिवसापासून रखडलेल्या या रस्त्याचे काम आज दिनांक ◀◀ पान २ वर





# बीडच्या उमेदवारीवरुन शरद पवार गटात फुट पडणार?

## भागवत तावरेंच्या उमेदवारीसाठी खा. सोनवणे सोबत; आ.क्षीरसागरांना बगल

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळवण्यासाठी बीड मतदार संघात बरेच इच्छुक आहेत. लोकसभेला जीवाचे रान करुन बजरंग सोनवणे यांना निवडूण आणणाऱ्या आ. संदिप क्षीरसागर यांनाच आता विधान सभा निवडणुकीत सोनवणे यांनी बगल दिल्याची चर्चा आहे. तर त्यांनी पत्रकार भागवत तावरे ◀◀ पान २ वर







### डॉ.श्रीहरी लहाने यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील प्रसिध्द स्त्री रोग तज्ञ व विठाई हॉस्पिटलचे संचालक तथा राष्ट्रसंत भगवान बाबा सामाजिक ◀◀ पान २ वर



# तुळशीराम पवार यांच्या भुमिकेकडे सर्वांचे लक्ष

## परळीत आज कार्यकर्ता बैठक

**परळी वै. । प्रतिनिधी**

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले काही दिवस अस्वस्थ असलेले मंत्री धनंजय मुंडे यांचे विश्वासू सहकारी महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार यांनी रविवारी दि.०६ ऑक्टोबर रोजी कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केले आहे. सातत्याने डावलले जाण्यापेक्षा वेगळा निर्णय घेणार का?, अशी आग्रही भूमिका घेणार कां? काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.बीड जिल्ह्यासह परळी वैजनाथ ◀◀ पान २ वर



# बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार

## अनिलदादा मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे अत्यंत विश्वासू- अर्जुनराव खोतकर

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना नेते संसदरत्न खासदार मां. डॉ श्रीकांत शिंदे साहेबांचा बीड विधानसभा संवाद दौरा विजयाकडे घेऊन जाणारा ठरला पाहिजे. बीड मतदार संघ शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेला आहे आणि सध्या सर्वात जास्त अनुकूल परिस्थिती आहे त्यामुळे बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार यात शंका नाही.जिल्हाप्रमुखामध्ये अनिलदादा जगताप मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या अत्यंत जवळचे आणि विश्वासू आहेत. दादांच्या कार्य पद्धतीवर शिंदे साहेबांचा विश्वास आहे. दादांना शिंदे साहेबांकडे विशेष आदर सन्मान आहे. आपल्याकडे दोन माहीने राहिलेत. येणारे दोन माहीने पक्षाला द्या. रात्रीचा दिवस दिवसाची रात्र करा. बीड मतदार संघावर आपली चांगली पकड आहे, आपण बाळासाहेबांचे शिवसैनिक आहोत त्यामुळे येणारी निवडणुका आपल्याला मोठ्या ताकदीने लढावी लागणार ◀◀ पान २ वर



### बालरंगभूमी परिषदेने दिव्यांगांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले-निलम शिर्के



बीड । प्रतिनिधी

दिव्यांग मुलांच्या चेहर्यावरील आनंद पाहण्यात वेगळेच समाधान असते. ही मुले निरागस असून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे काम बालरंगभूमी परिषदेने केले आहे, असे प्रतिपादन बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलम शिर्के सामंत यांनी केले.

बीडमध्ये बालरंगभूमी परिषद ◀◀ पान २ वर

### माळ चौथी



चतुर्थीचे दिवशीं
विश्वव्यापक जननी हो ।।
उपासकां पाहसी अंबे
प्रसन्न अंत:करणीं हो ।।
पूर्णकृपे पाहसी
जगन्माते मनमोहिमी हो ।।
भक्तांच्या माउली सुर
ते येती लोटांगणीं हो ।। ४ ।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।।

### विठ्ठलराव ठोंबरे यांचे निधन

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील उद्योजक, व्कटेश स्कुलचे अध्यक्ष प्रदिप ठोंबरे इंचे वडील विठ्ठलराव जिजा ठोंबरे यांचे शनिवारी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे व ७७ वर्ष होते. विठ्ठलराव ठोंबरे हे वारकरी सांप्रदायातील असल्याने परिसरात त्यांना मानणारा मोठा वर्ग होता. त्यांच्यावर ठोंबरे स्मशान भुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ठोंबरे कुटुंबाच्या दु:खात दै. लोकतंत्र परिवार सहभागी आहे.



# चाळीस वर्षात पंडितांना जे जमल नाही ते आ.लक्ष्मण पवारांनी करून दाखवले-येवले

## दैठण ते कटचिचोली रस्ता कांमाचे शिवराज पवारांच्या हास्ते उद्‌घाटन

**गेवराई । प्रतिनिधी**

मतदारसंघातील कट चिंचोली हे गाव गेवराई तालुक्यातील दैठण येथून हाकेच्या अंतरावर असणार हे गाव पंडिताच्या चाळीस वर्षाच्या सत्तेत रस्त्या पासून वंचित होते मतदार संघातील जनतेने आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांना निवडून दिले आणि आज आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या प्रयत्नातून दैठण ते कटचिंचोली रस्त्याला निधी मंजूर होऊन कामाचे उद्धाटन करण्यात येत आहे ४० वर्ष सत्ता उभोगणाऱ्या पंडितांना जे जमले नाही ते आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी करून दाखवले त्यामुळे आमदार लक्ष्मण पवार साहेबांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत कारण गेवराई तालुक्यातील कट चिंचोली हे गाव गोदा काठावर वसलेले गाव आहे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होऊन या ठिकाणी रस्त्याची चाळणी झालेली होती कटचिंचोली येथील रस्ता करण्यात यावा यासाठी ग्रामस्थांनी आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्याकडे सातत्याने मागणी केली होती.

ग्रामस्थाच्या मागणीची दखल घेत आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी यापूर्वीच कट चिंचोली ते गोंदी या रस्त्याला मंजुरी आणली होती पण महाविकास आघाडीच्या सरकार महाराष्ट्रात आले तेव्हा या सरकारने ◀◀ पान २ वर






# बेलगाव येथे १२ कोटी ३१ लाख रुपयांच्या विविध विकास कामाचे उद्या भुमिपुजन व लोकार्पण सोहळा

## माजी मंत्री सुरेश धस यांची उपस्थिती राहणार



**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील माजीमंत्री सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने मंजूर असलेल्या १२ कोटी ३१ लक्ष रुपयांच्या उद्या सोमवार दि.०७ ऑक्टोबर रोजी सकाळी ०९ वा. माजीमंत्री सुरेश धस यांच्या शुभहस्ते विविध विकास कामांचा भूमिपूजन व लोकार्पण सोहळा रेणुकमाता मंदिर समोर होणार असून या सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन समस्त ग्रामस्थ बेलगाव यांच्यावतीने करण्यात आले आहे.**

आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील भाविकांचे श्रद्धास्थान ◀◀ पान २ वर

### बाजारभाव



कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड,दि.०५ ऑक्टोबर २०२४
आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: २.०० क्विंटल** | | |
| २,६३६ | ३,२५० | २,९७८ |
| **ज्वारी/हायब्रिड :६४.०० क्विंटल** | | |
| २,०५० | २,४०१ | २,२१० |
| **मूग : २.५० क्विंटल** | | |
| ६,४०० | ६,८५१ | ६,६२५ |
| **तूर :१.०० क्विंटल** | | |
| ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| **उडीद : ३३.५० क्विंटल** | | |
| ६,५०१ | ७,६०० | ७,०६७ |
| **बाजरी : ८.०० क्विंटल** | | |
| २,२६४ | २,६६१ | २,४६१ |
| **मुग : ११.०० क्विंटल** | | |
| ६,७०० | ७,३०० | ६,९६३ |
| **सोयाबीन: ६६८.०० क्विंटल** | | |
| ३,१०१ | ४,३२० | ३,८०१ |
| **हरभरा: ५.०० क्विंटल** | | |
| ७,५०० | ७,५०० | ७,५०० |




cmyk

## अग्रलेख

# मराठी पाऊल पडते पुढे...!

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यावा, या गत दशकभरातील मागणीला यश आले असून अखेर केंद्र सरकारने त्यावर गुरुवारी शिक्कामोर्तब केले. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबतची घोषणा केली. मराठी भाषिकांचा स्वाभिमान वाढवणारा असा हा निर्णय आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची मराठी भाषिकांची प्रदीर्घ काळापासूनची मागणी होती. साहित्यिक आणि राजकीय नेत्यांसह सर्वांनी ती लावून धरली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठीसह पाच क्षेत्रीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला. यात बंगाली, आसामी, पाली आणि प्राकृत भाषांचा समावेश आहे. केंद्र सरकारने यापूर्वी तामिळ, संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळम आणि उडिया या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला होता. आता अभिजात भाषेचा दर्जा मिळालेल्या भाषांची एकूण संख्या ११ झाली आहे. महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक तोंडावर आली असताना मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याची घोषणा करण्यात आली आहे.

भारत सरकारच्या भाषातज्ज्ञ समितीकडून कोणत्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा द्यायचा यासंबंधीचा निर्णय घेतला जातो. गेली किमान १०-१२ वर्षांपासून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून लढा सुरू होता. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे खूप वर्षांपासूनची मराठी माणसाची मागणी पूर्ण झाली आहे. आजवर अनेक राज्य सरकारांनी अभिजात दर्जा देण्याची मागणी लावून धरली होती. संसदेच्या पावसाळी अधिवेशनातही महाराष्ट्राच्या खासदारांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. केंद्र सरकारच्या या निर्णयाने मराठी भाषा सातासमुद्रपार जगभरात आणखी वेगाने आणि प्रभावीपणे पोहोचणार आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय महाराष्ट्रातील साहित्यिकांना प्रोत्साहन देणारा ठरेल. भाषेला अभिजात दर्जा मिळणे म्हणजे त्या भाषेचा सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि साहित्यिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण असा दर्जा मान्य करणे होय. भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी काही विशिष्ट निकष पूर्ण करावे लागतात. सर्वप्रथम ती भाषा अत्यंत प्राचीन आणि तिचे ऐतिहासिक महत्त्व असावे लागते. ती भाषा इतर भाषांच्या विकासात योगदान दिलेली असावी तसेच त्या भाषेतील साहित्यिक संपदा अत्यंत वैविध्यपूर्ण असावी आणि ते साहित्य किमान दीड ते दोन हजार वर्षांपूर्वीचे असावे. शिवाय ती भाषा सध्याच्या बोलीभाषेपासून वेगळी असावी, म्हणजेच आज ती लोकांच्या दैनंदिन वापरात नसावी. तरीही तिचे सांस्कृतिक महत्त्व अबाधित असेल. त्यामुळे भाषेला ऐतिहासिक ठेवा मानला जातो. एखाद्या भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यावर त्या भाषेला अनेक फायदे मिळतात. त्या भाषेच्या संशोधनासाठी विशेष निधी उपलब्ध होतो. भाषा शास्त्रज्ञ व साहित्यिक त्या भाषेवर विस्तृत संशोधन करू शकतात. त्या भाषेतील साहित्य, लेखन, इतर दस्तऐवजांचे अनुवाद, प्रकाशन आणि पुनर्प्रकाशन करणे शक्य होते. त्याचबरोबर विद्यापीठे आणि इतर शिक्षण संस्थांमध्ये त्या भाषेच्या अभ्यासासाठी विशेष विभाग स्थापन करता येतात. त्यामुळे भाषेच्या अध्ययन आणि संशोधनाला नवी दिशा मिळते आणि ती भाषा पुढील पिढ्यांसाठी जतन होते. भाषा फक्त संवादाचे माध्यम नसते तर ती संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक असते. जेव्हा भाषेला अभिजात दर्जा मिळतो तेव्हा त्या भाषेतून जन्मलेली संस्कृती, तिचे तत्त्वज्ञान आणि विचार अधिक ठळकपणे समाजासमोर येतात. अशा भाषेचे जतन होते, तिचा अभ्यास वाढतो आणि तिच्या वारशाचे संवर्धन होण्यासाठी सरकारकडून आणि समाजाकडून प्रयत्न केले जातात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासंदर्भात राज्य शासनाने ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ज्ञ संशोधकांची समिती १० जानेवारी २०१२ रोजी गठित केली होती. या समितीने बरेचसे इतिहास संशोधन केले असून जुने संदर्भ, प्राचीन ग्रंथ, पुरातन काळातील ताम्रपट, कोरीव लेख, शिलालेखांचा संदर्भ आदी प्राचीन दस्तावेज तपासले असून त्यांचा आधार घेऊन ५०० पानांचा पुराव्यासह एक परिपूर्ण अहवाल शासनाला सादर केला होता. समितीने तयार केलेला मराठी भाषेमधील मूळ अहवाल २०१३ मध्ये केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला. त्यानंतर समितीने परिशिष्टांसह सादर केलेला इंग्रजीतील अहवालही केंद्र शासनाकडे १६ नोव्हेंबर २०१३ रोजी पाठविण्यात आला. त्यानंतर सातत्याने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत होता. अभिजात भाषेचा दर्जा लवकर मिळावा म्हणून पत्र मोहीमही राबविण्यात आली होती. या संदर्भात राष्ट्रपतींना सुमारे एक लाख पत्रेही पाठविण्यात आली होती. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी जो लढा सुरू होता तो आता केंद्र शासनाच्या निर्णयामुळे पूर्ण झाला आहे. आता भाषा समृद्धीसाठी केंद्राच्या अनेक योजनांमधून निधी उपलब्ध होऊ शकेल. मराठी भाषा ही चांगल्या पद्धतीने ज्ञानभाषा होऊ शकेल. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यास उशीर झाला असला तरी निर्णय झाला याचा आनंद आहे.

# बेरोजगारीसह विविध मुद्दयांवर ८ ऑक्टोबरला धडक मोर्चा

## राष्ट्रीय क्रांती सेनेच्या आंदोलनात सहभागी व्हा-परमेश्वर मुंडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव, धारुर, वडवणी प्रत्येक तालुक्याला एक हजार कोटीचे पॅकेज देऊन पंचतारांकीत औद्योगिक क्षेत्र निर्माण करुन मोठे उद्योग आणण्यात यावे, रामगीरी व नितेश राणे यांनी मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या प्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात यावी, ओबीसी व मुस्लिम समाजाला लोकसभेत व विधानसभेत राजकीय आरक्षण देऊन एससी, एसटीच्या धरतीवर जागा आरक्षीत करण्यात याव्यात यासह विविध मागण्यांसाठी राष्ट्रीय क्रांती सेनेच्या वतीने दि. ८ ऑक्टोबर रोजी धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे यांनी केले आहे.**

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, माजलगाव मतदार संघात पंचतारांकित औद्योगिक क्षेत्र निर्माण करुन मोठे उद्योग आणण्यात यावे. त्यामुळे माजलगाव मतदार संघातील बेरोजगारी कमी होण्यास मदत मिळेल, ऊसतोड स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होईल. माजलगाव मतदारसंघात अंदाजे दीड लाख ते एक लाख सत्तर हजार लोक उस तोडणीसाठी पश्चिम कर्नाटक महाराष्ट्रासह व इतर राज्यामध्ये स्थालांतरीत होतात. तसेच येथील बेरोजगारांना टेगनिकल कुशल कारागीर आणि अकुशल कारागीर यांना पुणे सुरत गठकाणी पोटाचाउदारगिवााह करण्यासाठी कामाला जातात. माजलगाव मतदारसंघात औरंगाबाद सारखी पंचतारांकीत औद्योगगक क्षेत्र गिमााण करण्याची गरज आहे. प्रत्येक तालुक्यात औद्योगगक क्षेत्र निर्माण करण्यात यावे. माजलगाव मतदारसंघात स्थागिक उद्योजकांना ५०% उद्योग निर्माण करण्यासाठी अनुदान देण्यात यावे. बाहेरील येणाऱ्या उद्योजकांसाठी विज, जी.एस.टी., इन्कम टॅक्स टॅक्स व कमी दरात त्यांना औद्योगिक क्षेत्रातील जमीन उपलब्ध करून देण्यात यावी, त्यामुळे उद्योग तील. मुस्लिम ओ.बी.सी. समाजाला विधानसभा व लोकसभा एस.सी.एस.टी.च्या धरतीवर राजकीय आरक्षण देऊन लोकसंख्या नुसार लोकसभा व विधानसभा आरक्षित करण्यात याव्यात. यासह राष्ट्री क्रांती सेनेच्या वतीने दि. ८ ऑक्टोबर रोजी माजलगाव येथील आंबेडकर चौक ते तहसिल कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन संस्थापक अध्यक्ष परमेश्वर मुंडे, जिबरान रवी देशमुख श्रीराम मुंडे, दत्ता नागरगोजे, सुहास मुंडे, नितीन मुंडे, संतोष नागरगोजे, अण्णा मायकर आदिंनी केले आहे.



# लाखा शिवारातील तीन शेतकऱ्याचे साडेतीन लाखाचे सोयाबीन जळून खाक

**केज । प्रतिनिधी**

मौजे लाखा येथील तीन शेतकरी यांनी मागील दाहा दिवसांपुर्वी त्यांच्या मालकीची जमिन सर्वे नं.७२/१,५२/२,५२/४ मधिल ०२हे. ५३ आर जमिनीमधील काढलेल्या सोयाबीन पिकाची वेगवेगळ्या तीन गंज करुन ताडपत्रीने व्यवस्थित पणे झाकुन ठेवले होते दी ३/१०/२०२४ रोजी शेतकरी शेख नसिब शेख हबीब , शेख वशिर शेख हवीव ,शेख शफिक शेख नसिब सर्व रा. कळंब ता. कळंब जि. धाराशिव हे तीघे जण त्यांचे लाखा येथील नातेवाईक मयत झाले म्हणून रात्री ११ वाजता लाखा या ठिकाणी गेले असता दी ४/१०/२०२४ रोजी पहाटे २ वाजताच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने सोयाबीन काढणी केलेल्या तिन्ही शेतकऱ्याच्या गंजी पेटवून देऊन अज्ञात व्यक्ती पसार झाला सकाळी ७ वाजता शेजारी अबून पठाण यांनी फोन करून सांगितले की तुमच्या शेतातील सोयाबीनच्या तिन्ही गंजी जळून खाक झाल्या आहे त्यावेळी ते राहत्या



घरी कळंब या ठिकाणी होते तात्काळ तिन्ही शेतकरी शेतावर आले असता संपूर्ण सोयाबीनची राख झाली होती यामुळे सदरील शेतकरी यांचे जवळपास साडेतीन ते चार लाख रुपयांचे नुकसान झाले आहे सदरील अज्ञात व्यक्तीने जाळलेल्या सोयाबीन पिकाचा पंचनामा करुन आमच्या झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई ची मागणी शेतकरी शेख नसिब शेख हबीब शेख बशिर शेख हवीब ,शेख शफिक शेख नसिब यांनी निवेदनाद्वारे केज तहसील कार्यालय यांच्याकडे केली आहे व केज पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरुद्ध तक्रार दाखल केली आहे.

# शरद पवारांच्या पक्षाच्या मुलाखतीसाठी इच्छुकांची गर्दी

### केजमधून संगिता ठोंबरे, अंजली घाडगे, पृथ्वीराज साठे

केज मतदार संघातून उमेदवारीसाठी तिघांमध्ये स्पर्धा असून पुणे येथे माजी आ. पृथ्वीराज साठे, संगिता ठोंबरे आणि अंजली घाडगे, अंकुशराव ढोबळे यांनी शरद पवार यांच्याकडे मुलाखत देऊन उमेदवारीची मागणी केली. साठे यांना पक्षाकडून हिरवा कंदिल मिळू शकतो, मात्र त्यांना खा. बजरंग सोनवणे यांचा विरोध असल्याची चर्चा आहे. तर संगिता ठोंबरे यांना सोनवणे यांची पसंती असून अंजली घाडगे या सुध्दा स्पर्धेत आहेत.

### बीड: इच्छुकांची संख्या सर्वात जास्त

बीड मतदार संघात बी.बी. जाधव, दिलीप गोरे, भागवत तावरे यांच्यासह आणखी काही जणांनी मुलाखती दिल्या आहेत. या मतदार संघात उमेदवारी मागणारांची संख्या जास्त असली तरी शरद पवार हे विद्यमान आमदार संदिप क्षीरसागर यांनाच उमेदवारी देतील, असे म्हटले जात आहे.

### परळीमध्ये ६ जणांनी दिल्या मुलाखती

परळी तदार संघात कृषींत्री धनंजय मुंडे ंना टक्कर देण्यासाठी तगड्या उमेदवाराच्या शोधात शरद पवार असून फुलचंद कराड, राजेभाऊ फड, सुदामती गुट्टे, माधव जाधव, दुष्त देशमुख, जीवनराव देशमुख यांनी मुलाखती दिल्या आहेत.

### माजलगावमधून जगतापांसह ९ जणांनी दिल्या मुलाखती

माजलगाव मतदार संघात पवारांच्या पक्षाची उमेदवारी कोणाला मिळेल, हे अजून तरी स्पष्ट झालेले नाही. शनिवारी पुण्यात भाजप नेते मोहन जगताप, माजी आ. राधाकृष्ण होके पाटील, प्रा. ईश्वर मुंडे, नारायण डक, ज्योतीताई डक, प्रा. श्रीहरी काळे, मनोहर डाके, गंगाभिशन थावरे, मंजूर शेख यांनी कार्याचा अहवाल देत मुलाखती देऊन उमेदवारीची मागणी केली आहे.

### गेवराईत मुलाखत देणारे सर्वच नवखे

या मतदार संघात पवारांची उमेदवारी आ. लक्ष्मण पवार यांना मिळेल, असे म्हटले जात असून शनिवारी पुजा मोरे यांच्यासह बरेच नवखे इच्छुक मुलाखतीसाठी आले होते.

### मुलाखतीसाठी आष्टीमधून इच्छुकांच्या रांगा

शरद पवार यांच्या पक्षाकडून उमेदवारी मिळावी यासाठी माजी आमदार साहेबराव दरेकर, शेख मेहबूब, एडवोकेट नर्सिंग जाधव, सुशीलाताई मोराळे, राम खाडे, अमोल तरटे यासह आणखी काही जणांनी शरद पवार यांच्याकडे मुलाखती दिल्या. शिवाय माजी आमदार व भाजप नेते भीमराव धोंडे हे सुद्धा पवारांकडून उमेदवारी घेण्यास इच्छुक आहेत.



**बीड । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडन शरद पवारांच्या पक्षाकडे इच्छुकांची मोठी गर्दी आहे. पुणे थे दि. ५ ऑक्टोबर रोजी स्वत: शरद पवारांनी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या. यावेळी सर्वच इच्छुकांनी आपला र्का अहवाल पवारांकडे सुपुर्द केला. त्यात बीड विधानसभा मतदार संघातून सर्वाधिक इच्छुक असून यावेळी बीड जिल्ह्यातील ६ मतदार संघातून दिग्गजांनी हजेरी लावली.**

बीड जिल्ह्यातील ६ पैकी केज मतदार संघ हा राखीव असून इतर ५ मतदार संघात शरद पवारांच्या पक्षाची उमेदवारी मिळवण्यासाठी अनेकांनी जोरदार फिल्डींग लावली आहे. यात महायुतीच्या नेत्यांची संख्या मोठी असून आष्टी, केज, बीड, माजलगाव यात मतदार संघात पवारांच्या पक्षाची उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी स्पर्धा आहे.

## पान १वरून...

### राज्यात सोयाबीन, मुग

तारीख दिली जाईल. त्यानुसार शेतकऱ्यांनी शेतमाल विक्रीसाठी खरेदी केंद्रावर घेऊन जावा, असे आवाहन पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे यांनी केले आहे. दरम्यान, हमीभाव खरेदीचे अंतर कमी असावे तसेच हमीभावाने विक्री केल्यानंतर जास्तीत जास्त एका आठवड्यात पेमेंट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावे, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

-----------

### बीडच्या उमेदवारीवरुन शरद

यांच्यासाठी आपली मर्जी दाखवल्याचे समजते. त्यामुळे बीडच्या उमेदवारीवरुन शरद पवारांच्या पक्षात उभी फुट पडण्याचे संकेत आहेत. विशेषत: खा. सोनवणे हे पुणे येथील मुलाखतीत तावरे यांच्यासोबत पवारांसमोर होते.

बीडचे आमदार संदिप क्षीरसागर ंनी लोकसभा निवडणुकीत बजरंग सोनवणे यांचे सारथ केले असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. एकही ेठा नेता नसताना आ. क्षीरसागर यांनी एकट्याने मोठ्या जिद्दीने किल्ला लढवला. ओबीसींचा विरोध असाताना सुध्दा ते सोनवणे यांच्या सोबत राहीले. सोनवणे यांच्या विजयात आ. क्षीरसागर यांचा मोलाचा वाटा असून आता विधान सभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर बीडमधून उमेदवारी मिळावी म्हणून अनेकजण इच्छुक आहेत. यात सीए बी.बी. जाधव, दिलीप गोरे, भागवत तावरे यांची नावे आघाडीवर आहेत. ज्या त्या मतदार संघात विद्यमान आमदारालाच उमेदवारी दिली जाणार असताना सुध्दा बीडच्या उमेदवारीवरुन रणसंग्रा सुरु आहे. आ. संदिप क्षीरसागर यांना उमेदवारी मिळू नये, म्हणून अनेकजण प्रयत्नशिल असल्याची सुध्दा जोरदार चर्चा आहे. खा. बजरंग सोनवणे यांनी आ. क्षीरसागर यांच्याऐवजी भागवत तावरे यांना उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा सुरु केली आहे. शनिवारी पुणे येथे पवारांच्या पक्षाच्या मुलाखती होत्या. यावेळी भागवत तावरे यांच्या सोबत खा. सोनवणे हे सुध्दा शरद पवारांसमोर होते. त्यामुळे सोनवणे यांनीच तावरे यांची पवारांकडे उमेदवारीची शिफारस केली असल्याची चर्चा आहे. आ. संदिप क्षीरसागर यांना उमेदवारी न देता ती तावरे यांना द्यावी असा सुर खासदारांचा असल्याचे बोलले जात असून बीडच्या उमेदवारीवरुन शरद पवारांच्या पक्षात उभी फुट पडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. मात्र लोकसभा निवडणुकीसोबत दाखवलेली एकनिष्ठा आ. संदिप क्षीरसागरांच्या शेवटी कामी येणार असल्याचे म्हटले जात आहे.

**चारच महिन्यात खासदारांची पलटी?**

खा. बजरंग सोनवणे ंना निवडूण आणण्यासाठी आ. संदिप क्षीरसागर यांनी मोठे कष्ट घेतले होते. पंकजा मुंडे आणि धनंज मुंडे ंच्या सोबत राजकी वैर घेतले. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत खा. सोनवणे हे आ. क्षीरसागर यांना साथ देतील असे सर्वांना वाटत होते. मात्र अवघ्या चार महिन्यात खासदारांनी पलटी मारत तावरे यांना पुढे केल्याची जोरदार चर्चा आहे.

--------

### आज मोंढा रोडच्या कामाचे पालकमंत्र

६ ऑक्टोबर रविवार रोजी सुरू होत असून या कामाचे उद्घाटन पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते तथा माजी आ.अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असून मोंढा रोडवरील जिजामाता चौकात हा उद्घाटन समारंभ होणार आहे. या कार्यक्रमाला शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नगरपालिकेचे माजी गटनेते फारुख पटेल व माजी नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केले आहे.

---------------

### मनोज जरांगे यांच्या मागणीवर

घेत मराठा समाजाला आरक्षण कसे द्यायचे हे सरकारने ठरवावे, असे रामदास आठवले यांनी म्हटले आहे. केंद्रात तिसऱ्यांदा मंत्रिपदी निवड झाल्याबद्दल रामदास आठवले यांचा शनिवार दि.०५ ऑक्टोबर रोजी बीड जिल्हा रिपब्लिकन पक्षाच्यावतीने शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर भव्य सत्कार करण्यात आला. या वेळी युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, बाबुराव कदम, गौतम सोनवणे, मिलिंद शेळके, ब्रम्हनाथ चव्हाण, सिद्धार्थ कासारे, सचिन मोहिते, भास्कर रोडे, राजू जोगदंड आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलताना मंत्री रामदास आठवले यांनी शरद पवार यांच्या आरक्षणाची मर्यादा ७५ टक्क्यांपर्यंत वाढविण्याच्या भूमिकेवरही टिका केली. सरकारमध्ये असताना शरद पवारांनी हे का केले नाही, असा सवाल आठवले यांनी केला. आठवले म्हणाले, सर्व समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम आम्ही करतो. मराठा आरक्षणाची भूमिका पहिली आमची होती. मराठा नेते आता जागे झाले आहेत. मराठा समाजाच्या पाठीशी आम्ही आहोत. बीडमध्ये आल्यानंतर दिवंगत विनायकराव मेटे, गोपीनाथराव मुंडे, प्रमोद महाजन यांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मला मंत्रिपद दिले त्या माध्यमातून आपल्याला गायरानधारक, उसतोड कामगार, बेरोजगार युवकांच्या प्रश्नासाठी प्रयत्न करायचे आहेत, असेही आठवले यांनी या वेळी सांगितले.

-------------

### डॉ.श्रीहरी लहाने यांचे निधन

प्रतिष्ठाणचे संस्थापक सचिव डॉ. श्रीहरी लिंबाजीराव लहाने यांचे शनिवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर सकाळी ११ वा. विठाई हॉस्पिटल लहाने फार्म जिरेवाडी, बीड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित होते. लहाने कुटुंबाच्या दु:खात दै. लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

---------

### तुळशीराम पवार यांच्या

तालुक्यात मागील तीस वर्षांपासून राजकीय सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणारे युवा नेते तुळशीराम पवार यांनी रविवार दि. ०६ ऑक्टोबर रोजी तुळशीराम पवार यांनी समर्थकांची बैठक बोलवून बैठीकत काय निर्णय घेणार आहेत. राज्यात सध्या विधानसभा निवडणूकीचे वारे जारदार सुरु आहे. त्यामध्ये परळीतही विधानसभा निवडणूक वातावरण तापायला सुरु झाल आहे. अख्या महाराष्ट्राच लक्ष परळी मतदार संघावर आहे. लोकसभा निवडणुकीनंतर मतदार संघातील अनेक नेते व कार्यकर्त्यांना डावलले जात असल्याची माहिती असून परळी मतदार संघातील अनेक सहकारी कार्यकर्ते पदाधिकारी हे वेगळा निर्णय घेण्याच्या तयारीत आहेत तर काहींना वेगळ्या चूल मांडली आहे. बीड जिल्हातील राजकीय क्षेत्रात अग्रेसर असणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार यांनी समर्थक कार्यकर्त्यांची सद्य परिस्थितीवर चर्चा व विचार मंथन करण्यासाठी रविवार दि. ०६ ऑक्टोबर रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले. तुळशीराम पवार यांनी लोकसभा निवडणुकीनंतर प्रदेश उपाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. रविवारच्या बैठकी संदर्भात आम्ही संपर्क केला असता आम्ही राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे साहेबांवर प्रेम करणारे कार्यकर्ते आहोत आमची कसलीही नाराज नाही मात्र व्यक्तिगत कारणासाठी राजीनामा दिल्याचे त्यांनी सांगितले. मात्र अचानक त्यांनी समर्थक कार्यकर्त्यांची बैठक बोलवल्याने युवा नेते तुळशीराम पवार हे वेगळा निर्णय घेणार का या चर्चांना उधाण आले आहे. का मोठा निर्णय घेणार याकडे परळी विधानसभा मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

-----------

### बीडची जागा शिवसेनेलाच

आहे असे प्रतिपादन शिवसेना उपनेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांनी केले.

संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांचा येत्या ८ ऑक्टोबर रोजी बीड विधानसभा संवाद दौरा मेळावा संपन्न होणार आहे. याच अनुषंगाने काल दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी दु. ३.०० वाजता दरम्यान बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे शिवसेना उपनेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मेळाव्याच्या पूर्व तयारीसाठी बैठक पडली. या बैठकीमध्ये अर्जुनजी खोतकर साहेब यांनी खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब बीड मतदार संघात पहिल्यांदा येत असून त्यांच्या संवाद दौरा मेळाव्या बाबत महत्वपूर्ण सूचना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, येणारा काळ शिवसेनेचा आणि शिवसैनिकांच्या भगव्याचा असून महाराष्ट्रावर भगवा फडकविण्यासाठी एकजूट होऊन ताकदीने विधानसभा निवडणूक लढवायची असल्याचे सांगितले. बीडची जागा ही शिवसेनेची आहे व ती शिवसेनेलाच सुटेल यात शंका नाही असे त्यांनी सांगितले. यादरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी देखील उपस्थितांना संबोधित केले व दोघांनी मिळून बीड मतदार संघात शिवसैनिक पदाधिकाऱ्यांना येणाऱ्या अडचणी समस्या अर्जुनराव खोतकर यांच्यासमोर मांडल्या. या बैठकीसाठी बीड जिल्हा शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, सर्व अंगीकृत संघटनेचे आजी- माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मी घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे- अनिलदादा जगताप**

खूप दिवसांपासून अन्याय सहन करतोय. प्रत्येकवेळी मला थांबवण्यात आले व माझा पाय ओढण्यात आला. मात्र आता मी आता घेणाऱ्या नाही देणाऱ्या पक्षात आहे. बीड मतदार संघावर शिवसेनेचा भगवा फडकवायचा आहे. कार्यकर्त्याला मोठं करण्याची, त्यांना ताकद देण्याची दानत मुख्यमंत्री शिंदे साहेबांमध्ये आहे व शिंदे साहेबांचा आशीर्वाद, विश्वास आणि पाठबळ माझ्यासोबत आहे म्हणून मला यावेळी कसलीच चिंता राहिली नाही. शिवसैनिकांनो, अफवांवर विश्वास ठेऊ नका बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे. त्यामुळे कामाला लागा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी बीड विधानसभा संवाद दौरा पूर्व नियोजन बैठकीत आपल्या शिवसैनिक पदाधिकाऱ्यांना केले.

--------------

### बालरंगभूमी परिषदेने दिव्यांगांच्या

आयोजित 'यहाँ के हम सिकंदर' दिव्यांग महोत्सव शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयात शनिवारी (दि.५) उत्साहात झाला. मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन करण्यात आले. यावेळी उद्घाटक म्हणून निलम शिर्के सामंत ह्या बोलत होत्या. व्यासपीठावर स्वागताध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर, संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांताध्यक्ष स्नेहल पाठक, सावरकर महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रिती पोहेकर, महोत्सव समितीच्या सदस्य दिपाली शेळके, बालरंगभूमी परिषदेचे प्रमुख कार्यवाह संजय पाटील देवळाणकर, अनुराधा चिंचोलकर, शाहीर विलास सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. निलम शिर्क सामंत म्हणाल्या की, राज्यात दिव्यांग महोत्सवाची सुरूवात सर्व प्रथम बीड शाखेच्या अध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या पुढाकारातून होत आहे. महोत्सवाचे हे पहिले वर्ष असून पुढील वर्षी यापेक्षा आणखी उत्तम नियोजन केले जाईल. दिव्यांग मुलांच्या पालनपोषणात आईनंतर शिक्षकाचा मोलाचा वाटा असतो. त्यामुळे दिव्यांग शिक्षकांनी पुढे येऊन बालरंगभूमी परिषदेला सूचना कराव्यात. सूचना विचारात घेऊन आणखी मोठा दिव्यांग महोत्सव आयोजित केला जाईल, असेही त्या म्हणाल्या. स्वागताध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, महोत्सवातून दिव्यांग मुलांच्या कलागुणांना वाव मिळणार आहे. दिव्यांग बालकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी दिव्यांग महोत्सव हा स्तुत्य उपक्रम आहे, असे ते म्हणाले. प्रास्ताविक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले. सुत्रसंचलन डॉ.संजय पाटील देवळाककर यांनी केले. आभार स्नेहल पालक यांनी मानले.

**दिव्यांग मुलांची समाजाशी नाळ जोडणे हा महोत्सवाचा उद्देश-डॉ.दिपाताई क्षीरसागर**

डॉ.दिपाताई क्षीरसागर म्हणाल्या की, दिव्यांग बालकांसाठी ॲड.निलम शिर्के सामंत यांचे मोठे कार्य आहे. दिव्यांग बालकांच्या चेहर्यावर हास्य फुलविण्याचे लाख मोलाचे कार्य त्यांच्या हातून होत आहे. परिषदेचा लोककला महोत्सव असो की दिव्यांग महोत्सव असा प्रत्येक उपक्रम राज्यात सर्वप्रथम बीडमधून राबविण्याची परंपरा यापुढे ही कायम ठेवू असे त्यांनी सांगितले.

**आकाशात फुगे सोडून लुटला आनंद; मुलांनी तयार केलेल्या वस्तूचे प्रदर्शन**

कार्यक्रमापूर्वी प्रांगणावर दिव्यांग मुलांच्या हस्ते फुगे आकाशात सोडून आनंद लुटला. बीड जिल्ह्यातील २३ शाळेतील २६१ दिव्यांग कलाकारांसह शिक्षकांचा सहभाग होता. यावेळी सांस्कृतिक नृत्य, एकांकिका, नाट्य, विविध गीते सादर करत आपली कला सादर केली. या दिव्यांग महोत्सवाचा दिव्यांग मुलांनी कार्यक्रमाचा आनंद लुटला. तसेच, दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन भरवले होते. या प्रदर्शनाला निलम शिर्के सामंत यांनी भेट देऊन त्यांचे कौतुक केले. प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी वस्तूंची खरेदी केली. यामुळे दिव्यांग मुलांच्या चेहर्यावर आनंद पहावयास मिळाला.

-----------

### चाळीस वर्षात पंडितांना जे जमल नाही ते

आमदार लक्ष्मण पवार यांनी मंजूर केलेले रस्ता इथून बारामतीकडे घेऊन गेले आणि पुन्हा एकदा कटचिंचोली ग्रामस्थांचा भ्रम निराश झाला होता. पण आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी पुन्हा एकदा पाठपुरावा करून दैठण ते कटचिंचोली रस्ता मंजूर करून आणला व आज त्याचे प्रत्यक्षात शिवराज पवार यांच्या हस्ते उद्घाटन होत आहे याचा ग्रामस्थांना आनंद आसल्याचे रामभाऊ येवले यांनी म्हटले आहे. आज दि.५ ऑक्टोबर रोजी गेवराई तालुक्यातील दैठण ते कटचिचोली, रामा५० ते टाकळगव्हान, गोपत पिंपळगाव, काठोडा तांडा ते जातेगाव रस्ता कांमाचा शिवराज पवार यांच्या हास्ते शुभारंभ संपन्न यावेळी सरपंच रवि निवारे, सोपान कोकणे,डॉ.खोटे,इंद्रजीत महाराज येवले,माऊली खोटे,रामजी पवार, दिपक वावरे,समाधान मस्के,श्रिराम घाटुळ, रामभाऊ येवले,अभियंता नितीन वीर, डॉ.अभिजीत येवले,संभाजी चोरमले,रामदास पवार, हनुमान येवले,भरत गायकवाड, गोरख मोटे,आण्णा धुमक,रामकिसन येवले,रामाजी पवार, शिवाजी भाले,अनिल औटी,सुनिल पराड,संदिपान खोटे,बप्पासाहेब खोटे,अजय गोखले,तानांजी येवले,राहुल पराड,नर्सिंग खौटे,शिवाजी येवले आदि ग्रामस्थ उपस्थित होते

-------------

### बेलगाव येथे १२ कोटी ३१ लाख रुपयांच्या विविध

असलेल्या रेणुकामाता मंदिरासाठी माजीमंत्री सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने आत्तापर्यंतचा सर्वात जास्त ४ कोटी ९० लक्ष रुपयांचा निधी देवस्थानच्या विकासासाठी आणला असल्याने त्यांचा ग्रामस्थांच्यावतीने नागरी सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी श्री.क्षेत्र रेणुकामाता देवस्थानसाठी ०४ कोटी ९० लक्ष रुपये,रा.मा ७० ते बेलगाव मांडवा रस्ता यासाठी ०३ कोटी रुपये,जलजीवन मिशन योजने अंतर्गत पाणी पुरवठा सोय करणे ६६ लक्ष रुपये, अंर्तगत जि.प. प्राथमिक शाळा कंपाउंड वॉल बांधकाम करणे ०१ कोटी रुपये,ग्रामपंचायत भवन बांधकाम करणे ३५ लक्ष रुपये,विठ्ठल रुख्मिणी मंदिर, लक्ष्मी माता मंदिर व रेणुका माता मंदिर पेव्हिंग ब्लॉक बसवणे ३० लक्ष रुपये,स्मशानभूमी अंतर्गत सिमेंट रस्ता व पेव्हिंग ब्लॉक ३० लक्ष रुपये, अंर्तगत रस्ता मजबुती करण करणे १.५ कोटी रुपये, रेणुका माता मंदिर परिसर सुशोभीकरण १० लक्ष रुपये,शिंदे वस्तीकडे जाणाऱ्या रस्त्यावर नळकांडी पुल बांधकाम करणे १० लक्ष रुपये, दलित वस्ती मध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे १० लक्ष रुपये, अहिल्यादेवी होळकर योजने अंतर्गत धनगर समाजासाठी ४० घरकुल मंजुरी, रमाबाई घरकुल योजने अंतर्गत २६ घरकुल मंजुरी या विविध विकास कामांचा भूमिपूजन व लोकार्पण सोहळा माजीमंत्री सुरेश धस यांच्या शुभहस्ते होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी अँड.साहेबराव म्हस्के असणार आहेत. पंचक्रोशीतील नागरिकांनी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बेलगांव समस्त ग्रामस्थांनी केले आहे.

कागदपत्र हरवली आहेत.

सुमित भिवसेन सानप या विद्यार्थ्याचे न्यायालय परीक्षा हॉल तिकीट व इतर कागदपत्र बीड ते मुंबई प्रवासादरम्यान हरवली आहे. ज्या काणेस सापडली असल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.

::::संपर्क::::
सुमित भिवसेन सानप
मो. ८५३०३५७०३५, ९७६३६७२६०४

cmyk

## नमोकार महामंत्राचे सात दिवस अखंड पठण

**अंबड । प्रतिनिधी**

गुरूंच्या आश्रयाशिवाय शिष्याचे कल्याण होऊ शकत नाही, गुरु भक्ति ने रहित असलेला शिष्य धनवान असो, सुंदर असो किंवा ज्ञानी असो, तो संसारा मधेच भ्रमण करतो. गुरु भक्ति पासून वंचित शिष्याचा संपूर्ण धार्मिक विधी कर्माच्या नाशाचे कारण नाही. उक्त उद्गार परम पूज्य श्रमणमुनी श्री १०८ विशेषसागर जी महाराज यांनी सात दिवसीय अखंड नमोकार महामंत्राच्या पठणाच्या प्रारंभी धार्मिक सभेला संबोधित करताना म्हनाले

पूज्य मुनिश्री पुढे म्हणाले की, जैन धर्माचा सर्वात मोठा मंत्र नमोकार मंत्र आहे. या मंत्राला मंत्रांचा राजा असेही म्हटले जाते. या मंत्रात पाच श्लोक, ८५ अक्षरे आणि ५८ शब्द आहेत. या मंत्राचा एक एक जप मनोभावे जप केल्यास एका उपवासाचे फळ मिळते. हा मंत्र भक्ती आणि मुक्ती प्रदान करतो. या मंत्राची आराधना केल्याने कुत्रा,सर्प सारख्या जीवांनाही देव गतिची प्राप्ती झाली. कार्यक्रमाची शुभ सुरुवात श्री १००८ महावीर दिगंबर जैन मंदीर, अंबड येथे झाली. सकाळी ६ वाजता शांतीधारा व ध्वजा रोहन, त्यानंतर भूमि शुद्धि, सकलीकरन व मंत्र पठण करुण मंगल कलश स्थापना व अखंड दीप प्रज्वलित करण्यात आला.पूज्य मुनिश्री विशेष सागरजी माहाराजांच्या मुखारबिंदातुन ७ दिवसीय अखण्ड पाठाचा शुभारंभ झाला

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि.०६ ऑक्टोबर २०२४


# शेतकऱ्यांनी बांधली कमरेला पहिली ओटी

## पावसाचे संकेत मिळाल्याने कापूस वेचणीसाठी लगबग

**शिरूर । शंकर भालेकर**

बीड जिल्ह्यात आगामी दोन -चार दिवसांमध्ये वरूनराजा सक्रिय होणार असल्याचे संकेत शेतकऱ्यांना मिळाल्याने शेतातील कापसाची फुटलेली बोंडे वेचून घेण्यासाठी शेतकऱ्यांनी कमरेला ओटी बांधून कापूस वेचणीचा श्री गणेशा केला आहे. भाद्रपद महिन्यात पाठव अश्विन महिन्याचे ही ऊन चटके धरू लागल्याने शेतामध्ये मोठ्या प्रमाणात कापसाची बोंडे फुटली आहेत. ही बोंडे वेचून घेण्यासाठी शेताच्या बांधावर मोठी लगबग पाहायला मिळत आहे.



शिरूर कासार तालुक्यामध्ये मृग नक्षत्रामध्येच समाधानकारक पाऊस झाल्याने २० जून पूर्वीच बहुतांश शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये कपाशीच्या पिकाची लागवड केली होती. या पिकाबरोबरच यावर्षी मुग, तुर सोयाबीन, सोयाबीन, बाजरी आदी खरीप हंगामातील पिकांची जून महिन्यातच पेरणी झाल्याने शेतामध्ये बहरदार पिके बोलू लागली. पेरणी -लागवडीनंतर या पिकांना पोषक असा कमी अधिक पाऊस झाल्याने या पिकांचा पुढे जोम ही चांगला राहिला. शेतकऱ्यांना अंतरमशागतीसाठी वारंवार बरसणाऱ्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात त्रासही झाला तरीही शेतकऱ्यांनी याची तमा न बाळगता शेतातील कामे चालू ठेवली. खुरपण करणे,पाळी घालणे, खत भरणी करणे, रोगराई नाशक फवारणी करणे, अधिक कामे करून घेतली होती. दरवर्षीच्या तुलनेत यावर्षी शेतातील पिके बहरदार दिसत असल्याची चित्र निर्माण झाले आहे. वेळीच लागवड झाल्यामुळे व त्याची अंतर मशागत झाल्यामुळे कपाशी बोंडे अगदी यावर्षी लवकरच फुटू लागली आहेत.त्यातच हवामान विभागाने आगामी दोन -चार दिवसामध्ये वरूनराजा सक्रिय होणार असल्याचे संकेत दिल्याने शेतकऱ्यांची कापूस वेचणीसाठी मोठी लगबग पाहायला मिळत आहे.

### दहा रुपये किलोचा भाव कायम

**कापूस वेचणी मंजूर मिळणे दुरापास्त झाल्याने शेतकऱ्यांना पहिल्या वेचणीला प्रती किलो १० दहा रुपयाचा भाव द्यावा लागत आहे. एकीकडे शेतीचा खर्च आणि शेती माला बाबतीत शेतकऱ्यांची होणारी अवहेलना ताळमेळ जुवाणारी नसल्याने वारंवार शेतकऱ्यांना अडचणी निर्माण करीत आहे.**

## श्री संताजी जगनाडे महाराज आर्थिक विकास महामंडळ स्थापन केल्याबदल समाजाच्या वतीने आनंदोत्सव साजरा



**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने तेली समाजासाठी श्री संताजी जगनाडे महाराज आर्थिक विकास महामंडळ नुकतेच स्थापन करण्यात आले. यानिमित्ताने येथील तेली समाजाच्या वतीने शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकात फटाके फोडून पेढे भरवून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

संपूर्ण महाराष्ट्रातील तेली समाजाच्या वतीने गेल्या २५ वर्षांपासून समाजाच्या आर्थिक विकासासाठी महामंडळ स्थापन करावे अशी मागणी सातत्याने करण्यात येत होती. सध्या विधानसभेच्या निवडणूका तोंडावर आल्याने ही मागणी जोर धरू लागली. दोन दिवसांपूर्वी नागपूर येथे महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे अध्यक्ष माजी खासदार रामदासजी तडस, उपाध्यक्ष तथा भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने ही मागणी करण्यात आली यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासित केले होते की, लवकरच ही मागणी पूर्ण करु त्याप्रमाणे अवघ्या चौवीस तासात हे महामंडळ स्थापन्याची घोषणा मंत्रीमंडळ बैठकीत करण्यात आली. याबद्दल महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे महासचिव भूषण कर्डिले सर, गजानन नाना शेलार व सर्व पदाधिकारी यांचे आभार व्यक्त करण्यासाठी व आनंदोत्सव परळीतील राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकात तेली समाजातील युवक व नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभागी होवून फटाक्यांची आतिषबाजी करत पेढे वाटून आनंद साजरा करत महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त करण्यात आले.

## मेडिकल कॉलेज वसतिगृहासाठी आ.कैलास गोरंट्याल यांनी केली इमारतींची पाहणी

जालना । प्रतिनीधी

जालन्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची व्यवस्था जिल्हा सरकारी रुग्णालय परिसरातील इमारतींमध्ये करण्यात येणार असून आ. कैलास गोरंटयाल आणि जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज शुक्रवारी दुपारी जिल्हा रुग्णालयास भेट देऊन तेथील काही इमारतींची पाहणी केली.



जालना येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास चार दिवसांपूर्वीच केंद्र शासनाकडून मंजुरी मिळाल्यानंतर जालन्यातील या महाविद्यालयाचा शासनाने कॅपराऊंड मध्ये समावेश करत ९०३३६४ असा कोड क्रमांक देखील काल गुरुवारी देण्यात आला होता. विशेष म्हणजे सदर वेबसाईट आज शुक्रवार पासून विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली आहे. प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची व्यवस्था करणे गरजेचे असल्याने आ.कैलास गोरंटयाल यांनी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.सुधीर चौधरी यांच्यासह आज शुक्रवारी दुपारी जिल्हा सरकारी रुग्णालयात जाऊन मुलं आणि मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह सुरू करण्यासाठी रुग्णालय परिसरातील काही इमारतींची पाहणी केली. त्यात जिल्हा सरकारी रुग्णालयासमोर कोव्हिड काळात उभारण्यात आलेली इमारत आणि परिचारिका प्रशिक्षण केंद्राची इमारत अशा दोन इमारती मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी जवळपास निश्चित करण्यात आल्याचे आ. कैलास गोरंटयाल यांनी सांगितले. या दोन्ही इमारतींमध्ये विद्यार्थ्यांसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना आ. गोरंटयाल यांनी यावेळी दिल्या. तर सदर इमारतींमधील काही किरकोळ दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करून देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता चंद्रशेखर नागरे यांना दिले आहेत. यावेळी जालना मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ.सुधीर चौधरी यांनीही आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता चंद्रशेखर नागरे, जिल्हा प्रशिक्षण केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.सरोज घोलप, सहाय्यक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.राजेंद्र गाडेकर, दत्ता पाटील घुले, राजेश पवार, सोपान तिरुखे, शेजुळ, यांच्यासह अन्य अधिकारी, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## अरोही स्टाईल स्टुडिओच्या दांडीया महोत्सवास प्रारंभ

परळी । प्रतिनिधी

परळी शहरातील अरोही स्टाईल स्टुडीओ च्या संचालिका,सामाजीक कार्यकर्त्या सौ.श्रध्दा गजानन हालगे- फुलारी यांच्या वतिने आयोजीत बेलवाडी येथे दांडीया स्पर्धेस प्रारंभ झाला या दांडीयाचे महिला पोलिस कर्मचार्यांच्या हस्ते व विविध क्षेत्रातील महिलांच्या उपस्थितीत शुक्रवार दि.४ ऑक्टोबर रोजी शुभारंभ करण्यात आला.या दांडीयामध्ये महिलांसाठी खेळ पैठणीचा,फॅशन शो,आरती ताट सजावट व दांडीया स्पर्धेतून दररोज आकर्षक बक्षीसे देण्यात येत आहेत.



परळी शहरातील महिलांना आपल्याच भागात दांडीया खेळाचा आनंद घेता यावा यासाठी अरोही स्टाईल स्टुडीओच्या वतिने नवरात्रोत्सवात प्रभु वैद्यनाथ मंदिराच्या पायथ्याशी असलेल्या गुरुलिंगस्वामी मठ,बेलवाडी येथे दररोज सायंकाळी ७ ते १० या वेळेत नारीशक्ती दांडीया महोत्सवाचे आयोजन केले आहे.यामध्ये फॅशन शो,खेळ पैठणीचा,आरती ताट सजावट व दांडीया स्पर्धा घेण्यात येत आहेत.तसेच दररोज वेगवेगळ्या स्पर्धा घेवुन यातील विजेत्या महिलांना पेंटेवार कलेक्शनच्या वतिने दररोज आकर्षक साडी व प्रथम विजेत्या महिलेसाठी पैठणी साडी,अर्जुन लक्ष्मण नावंदे यांच्या सिध्देश्वर ज्वेलर्सच्या वतिने सोन्याची नथ,राजलक्ष्मी १ग्रॅम ज्वेलरी,सानिया फॅशन व स्पार्कल मेकअप स्टुडीओच्या वतिने आकर्षक बक्षीसे देण्यात येणार आहेत.या दांडीया स्पर्धेत सहभाग नोंदवणार्या महिलांना पेंटेवार कलेक्शनच्या खरेदीवर वतिने पाच टक्के सूट देण्यात येणार आहे.या नारीशक्ती दांडीया महोत्सवाचे शुक्रवार दि.४ ऑक्टोबर रोजी पोलिस विभागातील महिलांच्या हस्ते व डॉक्टर, वकिल, सामाजीक कार्यकर्त्या,जेष्ठ गृहिणींच्या उपसथितीत शुभारंभ करण्यात आला.यावेळी प्रमुख पाहुण्या महीलांचे नारीशक्ती दांडीया महोत्सवाच्या आयोजिका तथा अरोही स्टाईल स्टुडीओच्या संचालिका सौ.श्रध्दाताई गजानन हालगे (फुलारी) यांनी स्वागत केले.



**जालना : अग्रसेन जयंती निमित्त जालन्यात अग्रवाल समाजातर्फे काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेत सहभागी होत आ.कैलास गोरंटयाल यांनी महाराज अग्रसेन यांच्या प्रतिमेचे पूजन करून दर्शन घेतले व उपस्थीत समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.(छाया : दीपक इगेवार)**

## अंबाजोगाई पिपल्स बँकेत कॅश भरणे व काढणे मशीनचा शानदार शुभारंभ

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेत शुक्रवार दि ४ रोजी कॅश भरणे व कॅश काढणे या मशीनचा शानदार शुभारंभ करण्यात आला. यावेळी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने बँकेच्या ग्राहकांचे हित जोपासण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे मत अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. या मशीनचा बँकेचे जेष्ठ संचालक प्रा वसंत चव्हाण यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आला. याप्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी, संचालक प्रा वसंत चव्हाण, ऍड विष्णुपंत सोळंके, पुरुषोत्तम चोकडा, अरुण काळे, सुधाकर विडेकर, ऍड सुधाकर कऱ्हाड, शेख दगडू दावल, सुरेश मोदी, प्रकाश लखेरा हर्षवर्धन वडमारे, स्नेहा हिवरेकर,महादेव आदमाणे, सुनील वाघळकर यांच्यासह मनोज लखेरा, किशोर परदेशी, बबन पाणकोळी, सुभाष पाणकोळी, यांच्यासह बँकेचे अनेक सभासद व ग्राहक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक ऍड विष्णुपंत सोळंके यांनी केले. त्यांनी राजकिशोर मोदी यांच्या माध्यमातून प्रगतीपथावर असलेल्या अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेने कॅश भरणे व कॅश काढणे () मशीनच्या रूपाने एक अनोखी भेट दिल्याचे सांगितले. या मशिनद्वारे १००, २००, व ५०० रुपयांच्या नोटा आपल्या खात्यात जमा करता येणार आहेत. या मशीनमध्ये ओरिजिनल व डुप्लिकेट नोटांची पारख देखील होणार असल्याने ही मशीन ग्राहकांच्या साठी अत्यंत उपयुक्त अशी ठरणारी असल्याचे ऍड सोळंकी यांनी सांगितले. बँकेचे मुख्य



**आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने बँकेकडून ग्राहकांचे हित जोपासण्याचा प्रयत्न केला जात आहे : संस्थापक राजकिशोर मोदी**

कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी या मशीनचा फायदा बँकेच्या ग्राहकांनी घ्यावा असे आवाहन केले.

आपले मनोगत व्यक्त करतांना बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आजपर्यंत आपली बँक म्हणून बँकेस केलेल्या सर्व ग्राहक व ठेवीदारांचे आभार व अभिनंदन केले. बँकेने आपला कारभार या संपूर्णपणे पारदर्शी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. बँकेच्या संपूर्ण शाखा या पूर्णपणे कॉम्प्युटराईज्ड असून वेळोवेळी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर बँकेच्या दैनंदिन व्यवहारात केला जात असून याचा थेट फायदा हा बँकेच्या ग्राहकांना होत असल्याचे मोदी यांनी अभिमानाने स्पष्ट केले. अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक ही दोन वेळा म्हणजेच संध्याकाळी देखील ग्राहकांना सेवा देत आहे. नुकताच आपल्या बँकेस पुणे जिल्हा सहकारी बँक असोसिएशनच्या वतीने शुन्य टक्के एनपीए हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले असल्याचे सांगत हे केवळ बँकेच्या ग्राहक, सभासद यांच्या सहकार्यामुळेच शक्य झाल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगितले. यापुढेही बँकेच्या वतीने जलद व गतिमान सेवा देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे अभिवचन बँकेचे अध्यक्ष या नात्याने राजकिशोर मोदी यांच्या वतीने उपस्थित सर्व ग्राहकांना देण्यात आले.

आजच्या काळात बँकेच्या ग्राहकांची गरज व निकड लक्षात घेऊन कॅश भरणे व कॅश काढणे या मशीनची उपलब्धता करण्यात आल्याचे सांगून या मशीनचा बँकेच्या ग्राहकांनी फायदा घेऊन आपला रांगेत उभा राहण्यापासूनचा वेळ वाचनार आहे. ही मशीन सकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत सुरू राहणार असून या मशीनचा फायदा शहर व परिसरातील सर्व ग्राहकांनी घेण्याचे आवाहन संस्थापक राजकिशोर मोदी यांनी केले. या मशीनच्या शुभारंभ प्रसंगी बँकेचे ग्राहक, ठेवीदार, सभासद व संचालक मंडळ मोठया संख्येने सहभागी झाले होते. यावेळी कचरूलाल सारडा, धम्मा सरवदे, दिनेश भराडीया,राजू मोरे, समियोद्दीन खतीब , खयामोद्दीन काझी, खालेद चाऊस, अंकुश हेडे, दत्ता सरवदे, आकाश कऱ्हाड, खलील जाफरी, विजय रापतवार, अस्लम शेख यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

पान ६ वरुन...

### वडवणीत रेणुका

निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान या ठिकाणी मातेच्या मनोभावे दर्शनासाठी सध्या नवरात्र महोत्सवादरम्यान भाविक उदंड अशी उपस्थिती दर्शवत आहेत. पहिली माळ गुरुवार रोजीपासूनच वडवणी सह परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून रेणुकामातेचे मनोभावे दर्शन घेतले. दररोजच्या सकाळ व सायंकाळच्या मातेच्या आरतीस देखील भाविकांची उपस्थिती लक्षणीय असते. या नवरात्र महोत्सवाच्या दरम्यान दिनांक ९ ऑक्टोबर २०२४ बुधवार रोजी सातव्या माळेला सायंकाळी ६ वाजता देवीची पालखी मिरवणूक मंदिरापासून ते संपूर्ण गाव अशा स्वरुपात टाळ-मृदंगाच्या, ढोल-ताशांच्या व हलकीच्या गजरात संपन्न होणार आहे. त्याचप्रमाणे दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ शनिवार रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता विजयादशमी दसरादिनी मंदिर परिसरातील डोंगरावर भव्य असा ३५ फुट उंचीचा रावण दहनाचा कार्यक्रम देखील मान्यवरांच्या शुभहस्ते व हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तसेच दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ बुधवार रोजी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महाप्रसाद दुधाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी याप्रसंगी वरील सर्व कार्यक्रमांस वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी व जनतेने उपस्थित राहून या दैदिप्यमान कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ, राहूल दुटाळ, बाळासाहेब दुटाळ, परशुराम दुटाळ यांनी केले आहे.

### दिंद्रुडचे प्राथमिक आरोग्य केंद्र

गरजवतांना आरोग्य सुविधा मिळण्यासाठी सुलभ झाले आहे. याचा लोकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आ. प्रकाश सोळंके यांनी केले.या केंद्राला उत्तम दर्जाचे साहित्य उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिले. मी गावचा भूमिपुत्र असल्याने माझी जबाबदारी व गावाप्रती उत्तरदायित्व आहे त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात दर्जेदार आरोग्य सुविधा मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचेही शेटे म्हणाले. माजलगाव तालुक्यातील सर्वात मोठे व सधन गाव म्हणून दिंद्रुड सुपरिचीत आहे. सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या या गावात दररोज हजारोंच्या संख्येने जनता ये जा करते. वांगी, उमरी, मोगरा व दिंद्रुड या चार उपकेंद्राला दिंद्रुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र जोडले गेले आहेत. २५ गावे व आठ तांड्यावरिल ३२ ते ३५ हजार जनतेसाठी या आरोग्य केंद्रात उपचार करण्यात येणार असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी मधुकर घुबडे यांनी दिली. पंचक्रोशीतील आरोग्य सेवेची गरज लक्षात घेता युती सरकारच्या काळात डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या प्रयत्नाने प्राथमिक आरोग्य केंद्रास मंजुरी मिळाली होती. या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उभारणीसाठी त्यांनी महत्त्वाचे प्रयत्न केले होते. ते आता सफल होत असल्याचा आनंद असल्याचे अनेक गावकऱ्यांनी बोलून दाखवले.

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र

माजलगाव मतदार संघासाठी एकूण १० उमेदवारांनी पक्षाची सभासद नोंदणी शुल्क,राष्ट्रवादी मासिकाची वार्षिक वर्गणी व नाम मात्र पक्ष निधी रक्कम भरून आपले पक्ष कार्याच्या अहवालासह उमेदवारी ईच्छूक अर्ज सादर केलेले होते. पक्षाच्या कार्यपध्दतीनूसार माजलगाव मतदार संघासाठी ईच्छूक उमेदवार म्हणून माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील , प्रा.ईश्वर मुंडे,नारायण डक,सौ.ज्योतीताई डक,प्रा.श्रीहरी काळे,मनोहर डाके,गंगाभिषन थावरे,मंजूर शेख यांचेसह मोहन जगताप यांनी मुलाखती दिल्या आहे.माजलगाव मतदार संघात ईतर पक्षातील उमेदवार आपल्या समर्थकांचे मेळावे घेऊन आपली किती हजारी मनसबदारी आहे ते दाखवून देत आहेत.माजलगाव मतदार संघात महा विकास आघाडीला अच्छे दिन येतील असे वातावरण दिसत आहे. या मुळे पक्ष बाहेरील ईच्छूक शरद पवारांना कोण भेटले,जयंत पाटील यांना कोण भेटले याच्या दररोज वेग वेगळ्या वेगळ्या बातम्या येत आहेत. मग खा.शरदचंद्र पवार हे पक्षासमोर मुलाखती देणाऱ्या निष्ठावंतापैकीच कोणा एकाला तिकीट देणार की मागे फंद फितूरी करून दगाबाजी करणारांनाच पायघड्या घालणार असा प्रश्न माजलगाव मतदार संघातील जनतेला पडला आहे.

### माणूस की सेवा फाऊंडेशनच्या

मोहन, जिल्हा कार्याध्यक्ष लांडगे सुखदेव, जिल्हा सह कार्याध्यक्ष डोळस गणपत, जिल्हा संघटक भालेराव बिबीषन, जिल्हा सहसंघटक रहीम भाई शेख, जिल्हा सल्लागार बनसोडे रोहिदास, जिल्हा सल्लागार कोकाटे प्रकाश,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख वाव्हळ आत्माराम, जिल्हा सह प्रसिद्धीप्रमुख सिरसट शिवप्रसाद,तालुका अध्यक्ष शिंदे नितीन,धारूर तालुका अध्यक्ष मल्हारी भालेराव व महीला जिल्हा अध्यक्षा कमलबाई वडमारे, तालुका कार्यकारिणीच्या सर्व महिला यांनी महेश शिंदे यांना शुभेच्छा दिल्या. बीड जिल्हा अध्यक्ष मस्के सर यांनी त्यांच्या कार्याची पावती म्हणून महेश शिंदे यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### हनुमान नगर दांडियाचा

सन्मान उपक्रमास शुभेच्छा दिल्या.दररोज ९ महिलेंचा खण नारळ चोळी देवून सत्कार करण्याच्या सन्मान कार्यक्रमाचे कौतुकही केले.तसेच हनुमान नगर दांडियामध्ये सहभागी झालेल्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. समयोचित वेळेत युवा कार्यकर्त्यांशी संवादही साधला.दरवर्षी दांडिया उत्सवात महिलांसाठी असेच सुंदर व महिलेंचा सन्मान व सत्कार उपक्रम राबविण्यात यावे अशा शुभेच्छा दिल्या.यावेळी कार्यक्रमास रील स्टार बकुळा फेम सोनाली राठोड,नाम्या देवा देवकते यांचीही विशेष उपस्थिती होती.सदरील दांडिया उत्सवाचे अध्यक्ष बालाजी खैरमोडे,उपाध्यक्ष अक्षय कदम, सचिव अभिषेक पाटील,शंकर भिसे, संजय गंभीरे,संजय सुर्यवंशी,संतोष बिचकुले,चेतन रामरूले,उत्तम हुलगुंडे आदींच्या हस्ते प्रमुख पाहूण्यांचा सत्कार संपन्न झाला. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी छत्रपती गणेश मंडळांच्या सर्व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

### एक हजार वर्षापूर्वीचे हेमाड पंथी

भक्तांच्या भक्तीला प्रसन्न होऊन भक्तगणांची इच्छापूर्ती करणारी ही जागृत देवी आहे.या मंदिराच्या गाभाऱ्यात देवीचा सुंदर असाच तांदळा आहे.सिंहासनारुढ झालेली आहे. देवीच्या अंगावर सोन्या-चांदीचे दागिने आहेत.या मंदिरात भक्तांना प्रवेश केला की, मन प्रसन्न होते.मंदिर परिसरात असणारे कुंडाचे पाणी नेहमी स्वच्छ व निर्मळ असते या देवस्थानला जाण्यासाठी आष्टी येथुन नवरात्र उत्सवात आष्टी बस आगारातर्फे बसची व्यवस्था केली जाते. महाराष्ट्रातून येथे लाखो भाविक दरवर्षी दर्शनासाठी येतात नवरात्र महोत्सवात देवीची पहाटे पुजा काकड आरती दुपारी तीर्थप्रसादाचा कार्यक्रम होतो. परिसरातील हजारो भक्त या उत्साहात उत्स्फूर्तपणे सहभागी होतात.पारगाव येथील देवीचे भक्त यादरम्यान ९ दिवसाचे उपवास करतात हे उपवास श्रद्धेतून केले जातात देवीचे मंदिर परिसरात विविध कार्यक्रमाचे आयोजन नवरात्र उत्सवात केले जाते. त्यामध्ये आराधी गीत,भजन, कीर्तन, रात्री जागर, मातेश्वरी ग्रंथाचे वाचन देवीच्या ओव्या अधिक कार्यक्रम होतात. देवीला प्रतिदिनी दुपारी किमान पाच हजार नागवेली पानांचा हार चढविला जातो.देवीच्या मुखवट्यावर आल्यावर देवीची विलोभनीय मूर्ती भक्तजनांना अधिकच भुरळ पाडून जाते. ही शेण भक्तगणांना प्रसाद म्हणून दिला जातो पण खाल्ल्यावर थुंकू नये असे सांगितले जाते. देवीचा होम अष्टमीच्या रात्री सुरू होऊन नवमीच्या प्रारंभी समाप्त होतो विजयादशमीच्या दिवशी पालखी अंगणापासून आल्यावर पारगाव गावातून वाजत गाजत मिरवणूक काढली जाते.यावर्षीही येथे हरिनाम सप्ताह होत आहे.

--------------

cmyk

# तेलबिया व खाद्यतेलासाठीच्या राष्ट्रीय अभियानाला केंद्राकडून १० हजार कोटी

पुणे : आपल्या देशात खाद्यतेलाची मोठ्या प्रमाणात आयात केली जाते. खाद्यतेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी तसेच तेलबिया उत्पादनाला चालना देण्यासाठी व खाद्यतेलांमध्ये स्वयंपूर्णता मिळवण्यासाठी राष्ट्रीय तेलबिया व खाद्यतेल अभियानाला झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे.

येत्या सात वर्षात तेलबियांच्या क्षेत्रात स्वयंपूर्ण होण्याच्या उद्देशानं हे अभियान चालवलं जाणार आहे. सन २०२४-२५ ते सन २०३०-३१ या सात वर्षांसाठी १० हजार १०३ कोटी रुपयांचा निधी यासाठी मंजुर करण्यात आला आहे. शुक्रवारी (दि.३) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पार पडली त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला आहे. देशात सन २०२२-२३ मध्ये झालेल्या ३९ दशलक्ष टन तेलबिया उत्पादनात वाढ करून ते सन २०३०-३१ पर्यंत ६९.७ दशलक्ष टनापर्यंत नेणे, तेलबिया लागवडीखालील क्षेत्रामध्ये अतिरिक्त ४० लाख हेक्टरने वाढ करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.



भारत आपल्या वार्षिक खाद्यतेलाच्या गरजेच्या ६० टक्क्यांहून अधिक आयात करतो. भारत इंडोनेशिया आणि मलेशिया येथून पामतेल आयात करतो तर सोयाबीन तेल ब्राझील आणि अर्जेंटिना येथून आयात केले जाते. सूर्यफूल प्रामुख्याने रशिया आणि युक्रेनमधून येते. तेलबिया अभियानाच्या माध्यमातून रेपसीड-मोहरी, भुईमूग, सोयाबीन, सूर्यफूल आणि तीळ यांसारख्या मुख्य प्राथमिक तेलबिया पिकांचे उत्पादन वाढवण्यावर तसेच कापूस बियाणे, तांदळाचा कोंडा आणि ट्री बोर्न ऑइलसारख्या दुय्यम स्रोतांपासून संकलन आणि तेल काढण्याची कार्यक्षमता वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे.

जीनोम एडिटिंगसारख्या अत्याधुनिक जागतिक तंत्रज्ञानाचा वापर करून उच्च-गुणवत्तेच्या बियाण्यांचा विकास करण्यात येणार आहे. दर्जेदार बियाण्यांची वेळेवर उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी, 'सीड ऑथेंटिकेशन, ट्रेसेबिलिटी अँड होलिस्टिक इन्व्हेंटरी (साथी)' पोर्टलद्वारे हे अभियान ऑनलाइन ५-वर्षीय रोलिंग सीड योजना सादर करेल, ज्यामुळे राज्यांना सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक संस्था आणि सरकारी किंवा खासगी बियाणे महामंडळांसह बियाणे उत्पादक संस्थांशी आगाऊ करार करणे शक्य होईल. बियाणे उत्पादनाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात ६५ नवीन बियाणे केंद्रे आणि ५० बियाणे साठवण युनिट्सची स्थापना केली जाईल., असे केंद्र सरकारच्या वतीने सांगण्यात आले.

## डाळींब हस्त बहार नियोजन



कमी पावसाच्या प्रदेशात डाळिंबाचा हस्त बहार घेणे योग्य समजले जाते. परंतु परतीचा पावसामुळे या बहाराच्या नियोजनामध्ये अडसर निर्माण होऊ शकते. यासाठी योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे असते. डाळिंब हस्त बहारातील ताण सोडणे आणि बहार नियमन यावेळी कसे नियोजन करावे याविषयी महत्वाची माहिती असणे गरजेचे आहे.

डाळिंब हस्त बहार नियोजन : पावसाळा संपल्यानंतर बागेला २०-२५ दिवस पाणी देऊ नका. बागेला खताची मात्रा देताना फळबागांमध्ये पडलेली पाने, काडीकचरा काढून टाकावा, अथवा जमिनीत गाडून टाकावा.

बागेतील झाडांना बसलेल्या ताणाच्या तीव्रतेनुसार इथेफॉनचा वापर करून पानगळ करावी. बेमोसमी पाऊस किंवा इतर कारणांमुळे झाडांवर योग्य ताण बसला नसल्यास इथेफॉनच्या (३९ एसएल) दोन फवारण्या कराव्यात. पहिली फवारणी ०.९ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे तर दुसरी फवारणी ५ ते ८ दिवसांनी पानांच्या पिवळेपणा नुसार १ ते १.५ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे करावी. प्रत्येक इथेफॉन फवारणीमध्ये १२-६१-० किंवा ०-५२-३४ (५ ग्रॅम प्रति लिटर पाणी) मिसळून फवारणी करावी.

झाडांना योग्य ताण बसला असल्यास पाने पिवळी असताना इथेफॉन (३९ ) १ मिली प्रति लिटर पाणी + १२-६१-० किंवा ०-५२-३४ - ५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

फांद्यांची घनता जास्त असल्यास, हवा खेळती राहण्यासाठी व सूर्यप्रकाश पोहोचण्यासाठी पेन्सिल आकाराच्या फांद्या शेंड्याकडून १० ते १५ सें.मी. कट करून हलकी छाटणी करावी. खोडापासूनचे फुटवे काढावेत. पाऊस थांबल्यानंतर आणि हवामान स्वच्छ झाल्यानंतरच कीटकनाशके आणि बुरशीनाशकांची फवारणी करावी.

## रब्बी प्रात्यक्षिकांसाठी शेतकऱ्यांना मिळणार अनुदान

मुंबई : राज्याच्या रब्बी हंगामाची पूर्वतयारी सुरू झाली असून पीक प्रात्यक्षिकांसाठी शेतकऱ्यांना निविष्ठांकरीता अनुदान मिळणार आहे. कृषी आयुक्तालयाच्या विस्तार विभागाचे उपसंचालक शिवकुमार सदाफुले यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेतकऱ्यांना निविष्ठांच्या अनुदानासाठी रविवारपर्यंत (ता.६) ऑनलाइन अर्ज दाखल करता येणार आहेत. २०२४-२५ मधील रब्बी हंगाम नियोजनाचा भाग म्हणून अन्न आणि पोषण सुरक्षा, अन्नधान्य पिके व राष्ट्रीय खाद्य तेल अभियान, गळीतधान्य पिके या उपक्रमांमधून पीक प्रात्यक्षिके घेतली जाणार आहेत. त्यापैकी हरभरा, गहू, जवस, करडई, भुईमूग व मोहरी या पिकांकरिता अनुदान मिळणार आहे. महाडीबीटी प्रणालीद्वारे mahadbt.maharashtra.gov.in या



संकेतस्थळावर बियाणे घटकासाठी सध्या ऑनलाइन अर्ज स्वीकारले जात आहेत. पीक प्रात्यक्षिके शेतकरी गटांमार्फत राबविली जाणार आहेत. प्रात्यक्षिकासाठी एका शेतकऱ्याला एक एकर मर्यादेत निविष्ठा स्वरूपात अनुदान मिळेल. प्रमाणित बियाणे वितरणासाठी एका शेतकऱ्याला कमाल दोन हेक्टरसाठी बियाणे मिळेल. निविष्ठांचा पुरवठ्यासाठी लाभार्थ्यांची निवड ऑनलाइन पद्धतीने करण्यात आहे. त्यामुळे वेळेत अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

## यंदाच्या हंगामात महाराष्ट्राचा ऊस कर्नाटकात जाण्याला लागणार 'ब्रेक'!

कोल्हापूर : यंदा महाराष्ट्र आणि कर्नाटकातील कारखाने एकाच दिवशी म्हणजेच १५ नोव्हेंबरला सुरु होणार असल्याने महाराष्ट्रातून कर्नाटकात होणाऱ्या उसाच्या पळवापळवीला 'ब्रेक' लागण्याची शक्यता आहे. कारण दरवर्षी कर्नाटकातील कारखाने अगोदर सुरु होतात आणि कोल्हापूर आणि सांगलीच्या सीमाभागातील ऊस मोठ्या प्रमाणात गाळपासाठी नेतात. त्याचा फटका महाराष्ट्रातील सीमाभागातील कारखान्यांना बसतो.

सीमेवरच्या गावांचा बहुतांशी ऊस दोन्ही राज्यातील कारखान्यांमध्ये विभागला जातो. यंदा मात्र ऊस दारासाठी शेतकरी संघटनांनी जर आंदोलनाचे हत्यार उपसले नाही तर दोन्ही राज्यांच्या तोडी एकदम सुरू होतील. यामुळे पळवापळवीवर निर्बंध येतील. हंगाम तारीख निश्चित झाली असली अद्याप तरी कोणत्याही संघटनेने यंदाची भूमिका स्पष्ट केलेली नाही. कोल्हापूर जिल्ह्यातील २३ कारखान्यांकडे



१८७ लाख हेक्टर उसाची नोंद झाली आहे. त्यातून १४० लाख टन उस उपलब्ध होणार आहे. सांगली जिल्ह्यातील १७ कारखान्यांकडे १३७ लाख हेक्टर ऊस नोंद झाली आहे. त्यातून १२५ लाख टन ऊस उपलब्ध होऊ शकतो. कोल्हापुरातील २३ कारखान्यांची प्रतिदिन गाळप क्षमता १ लाख ३७ हजार टन तर सांगली जिल्ह्यातील १७ कारखान्यांची प्रतिदिन गाळप क्षमता ८८ हजार टन इतकी आहे. म्हणजे काल्हापूर विभागात एकूण तोडणीचा ऊस २५५ लाख टन इतका आहे. विभागाची गाळप क्षमता २ लाख २५ हजार टन प्रतिदिन इतकी आहे. म्हणजे या विभागातील गाळप हंगाम १२० ते १२५ दिवस इतका चालण्याची शक्यता आहे.

## थारपारकर जातीची गाय देते १८ लिटर दूध

गेल्या काही वर्षांत भारतातील दुग्ध व्यवसाय झपाट्याने म्हणजे ६.४ टक्के दराने वाढला आहे. याचा अर्थ अनेक शेतकरी आता जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय जवळ करू लागली असल्याचे दिसते.थारपारकर ही गाय त्याच्या विशेष गुणांमुळे दुग्ध व्यवसायासाठी अतिशय उपयुक्त आहे. वास्तविक, या जातीच्या गायीमध्ये ४५ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त तापमानात जास्त दूध देण्याची क्षमता असते. प्रतिकूल परिस्थितीतही त्याच्या उत्पादन कार्यक्षमतेत काही फरक पडत नाही. जिथे वाढत्या तापमानासह, इतर जातीच्या गाई आणि जनावरांचे दूध उत्पादन २० ते ३० टक्के कमी होते. त्याच वेळी, ही जाती प्रतिकूल परिस्थितीतही अधिक दूध देण्यास सक्षम आहे. त्यांची उत्पादनक्षमता इतर जातींपेक्षा चांगली आहे. ती आयुष्यभर १५ मुलांना जन्म देऊ शकते, तर इतर जातींच्या गायी ५ ते १० मुलांना जन्म देऊ शकतात. उष्ण आणि कोरडे हवामान सहन करण्यास सक्षम, या जातीचे आयुष्य २५ ते २८ वर्षे आहे.

या राज्यात थारपारकर अधिक प्रमाणात : ही जात मूळ राजस्थान राज्यातील आहे, ती येथे बाडमेर, जैसलमेर, जोधपूर, जालौन आणि सिरोही भागात आढळते. वास्तविक राजस्थानचा हा



वाळवंट प्रदेश आहे, तो थार वाळवंट म्हणून ओळखला जातो. यामुळेच गायीच्या जातीला थारपारकर असे नाव पडले. राजस्थानमध्ये याला मालानी या नावानेही ओळखले जाते.इतर ठिकाणीही पाळणे शक्य : राजस्थान व्यतिरिक्त, देशाच्या विविध भागांमध्ये त्याचे संगोपन केले जाऊ शकते.

पुण्याचे क्लब ऑफ वृंदावन थारपारकरमधील चंद्रकांत भरेकर सांगतात की ते गेल्या ५ वर्षांपासून थारपारकरा गाई पाळतात. त्याच्या क्लबमध्ये या जातीच्या १०० पेक्षा जास्त गायी आहेत. ज्यामध्ये अनेक गायी एकावेळी १६ ते १८ लिटर दूध देतात. प्रतिकूल परिस्थितीत टिकून रहाते : आपणा सर्वांना माहित आहे की राजस्थानचे थार वाळवंट एक उष्ण क्षेत्र आहे, येथील तापमान ५२ अंश सेल्सिअस पर्यंत नोंदवले गेले आहे. हिवाळ्यात तापमान शून्य अंशांवर पोहोचते. अशा परिस्थितीत या जातीची गाय उच्च व कमी तापमानाचा सामना करण्यास सक्षम आहे. राजस्थानच्या उष्ण हवामानात टिकून राहण्यास सक्षम, थारपारकर इतर प्रांतांमध्ये सहजपणे पाळले जाऊ शकते.थारपारकर गायीची ओळख : थारपारकर पांढरा आणि जाड डोळ्यांचा आणि दिसायला अतिशय सुंदर आहे. देशी जातीची गाय दिसायला सुंदर आहे, पण या जातीची स्वतःची वेगळी ओळख आहे. जरी ते दिसायला पांढरे असले तरी हिवाळ्यात त्याच्या शरीरावर काळे केस वाढत असतात. थारपारकरचे डोके मध्यम आकाराचे असते आहे, कपाळ रुंद आहे आणि कपाळ उंच असते. या गायींची उंची सहिवाल आणि राठी जातीच्या गायींपेक्षा किंचित जास्त असते.




### महत्वाच्या घटना

१९०८ : ऑस्ट्रियाने बोस्निया व हेर्झेगोविना हे प्रांत बळकावले.
१९२७ : 'वॉर्नर ब्रदर्स'चा 'जॅझ सिंगर' हा जगातील पहिला बोलपट अमेरिकेत प्रदर्शित झाला.
१९४९ : पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते खडकवासला येथे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या इमारतीची कोनशिला बसवण्यात आली.
१९६३ : पुणे आकाशवाणी केंद्राचे सांगली हे उपकेंद्र सुरू झाले.
१९७३ : इजिप्त व सीरीयाने मिळुन इस्त्राएलवर हल्ला केला.
१९७७ : सोव्हियत संघाद्वारे निर्मित मिग २९ या लढाऊ विमानाचे देशांत पहिल्यांदा उड्डाण करण्यात आले.
१९८१ : इजिप्तचे अध्यक्ष अन्वर सादत यांची हत्या
१९८७ : फिजी प्रजासताक बनले.
१९८९ : मीरा साहेब फातिमा बिबी यांची भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदी नियुक्ती करण्यात आली. न्यायाधीशपदी विराजमान होणाऱ्या त्या पहिल्या मुस्लीम महिला होत्या.
२००७ : जेसन लुइस याने वल्ह्याच्या होडीतुन पृथ्वीप्रदक्षिणा पूर्ण केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

९५२ : मध्ये झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे तसेच १९६२ मधे नांदेड येथे झालेल्या साहित्य संमेलनातील कविसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांचे 'वेलांटी', 'पहाटतारा', 'शततारका', 'रुद्रवीणा', 'दोनुली', 'मरणगंध' इ. काव्यसंग्रह तसेच अनेक ललित, स्फुट व समीक्षणात्मक लेख प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'मावळते शब्द' या कवितेला कवी केशवसुत पारितोषिक मिळाले. (मृत्यू: ८ सप्टेंबर १९९१)
१६७९ : मुघल शासक मुहम्मद अकबर यांचे पुत्र व मुघल वंशाचे १२ वे शासक बादशाहा नेक सियर यांचा जन्मदिन.
१७७९ : माऊंट स्टुअर्ट एल्फिस्टन स्कॉटिश मुत्सद्दी, हिन्दुस्थानातील मुंबई प्रांताचे गवर्नर, कुशल प्रशासक व इतिहासकार. त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणले. त्यांनी हिस्ट्री ऑफ इंडिया' या दोन खंडात भारताचा इतिहास लिहिला. (मृत्यू: २० नोव्हेंबर १८५९)
१८६६ : रेडिओटेलेफोनी चे संस्थोधक रेगिनाल्ड फेसेनडेन यांचा जन्म. (मृत्यू: २२ जुलै १९३२)
१८९३ : मेघनाद साहा खगोलभौतिकशास्त्रज्ञ व संसदसदस्य. तार्यांच्या वातावरणाचे तापमान आणि आयनीभवन यांचा संबंध स्पष्ट करणारा सिद्धांत त्यांनी मांडला. भारताचे स्वत:चे राष्ट्रीय पंचांग त्यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आले. (मृत्यू: १६ फेब्रुवारी १९५६)
१९१२ : डॉ. हरी जीवन तथा एच. जे. अर्णीकर अणूरसायनशास्त्रज्ञ, प्राध्यापक (मृत्यू: २२ नोव्हेंबर २०००)
१९१३ : वामन रामराव तथा 'वा. रा.' कांत कवी. त्यांची 'सखी शेजारिणी तू हसत रहा', 'त्यातरुतळी विसरले गीत', 'बगळ्यांची माळ फुले अजुन अंबरात', 'राहिले ओठातल्या ओठात वेडे शब्द माझे' इ. भावगीते लोकप्रिय आहेत.
१९१४ : थोर हेअरडल नॉर्वेजियन दर्यावर्दी व संशोधक (मृत्यू: १८ एप्रिल २००२)
१९३० : रिची बेनो ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू व समालोचक
१९४३ : डॉ. रत्नाकर मंचरकर संत साहित्याचे गाढे अभ्यासक, साक्षेपी समीक्षक व संशोधक (मृत्यू: २० फेब्रुवारी २०१२)
१९४६ : विनोद खन्ना अभिनेते, चित्रपट निर्माते व खासदार
१९४६ : टोनी ग्रेग इंग्लिश क्रिकेटपटू व समालोचक (मृत्यू: २९ डिसेंबर २०१२)
१९७२ : सलील कुलकर्णी संगीतकार

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६१ : गुरू हर राय शिखांचे ७ वे गुरू (जन्म: २६ फेब्रुवारी १६३०)
१८९२ : लॉर्ड टेनिसन इंग्लिश कवी (जन्म: ६ ऑगस्ट १८०९)
१९५१ : विल केलॉग 'केलॉग्ज' चा मालक (जन्म: ७ एप्रिल १८६०)
१९७४ : व्ही. के. कृष्ण मेनन भारताचे संरक्षणमंत्री व मुत्सद्दी (जन्म: ३ मे १८९६)
१९७९ : महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार इतिहासकार, लेखक, वक्ते आणि पुणे विद्यापीठाचे कुलगुरू १९६१-१९६४, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू १९४८, पद्मविभूषण, मराठी शुद्धलेखन महामंडळाचे अध्यक्ष, प्राचीन मराठी इतिहास आणि मराठ्यांचा इतिहास यांचे व्यासंगी (जन्म: ५ ऑगस्ट १८९०)
१९८१ : अन्वर सादात इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष व नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २५ डिसेंबर १९१८)
१९८६ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित राजस्थान येथील भारतीय स्वातंत्र्य सेनानी व राजकारणी नेता व समाजसेवक गोकुलभाई भट्ट यांचे निधन.
२००७ : बाबासाहेब भोसले महाराष्ट्राचे ९ वे मुख्यमंत्री कार्यकाल : २१ जानेवारी १९८२ ते १ फेब्रुवारी १९८३ (जन्म: १५ जानेवारी १९२१)
२००७ : एल. एम. सिंघवी लोकसभा सदस्य, कायदेपंडित, विद्वान, मुत्सद्दी व भारताचे इंग्लंडमधील राजदूत (जन्म: ९ नोव्हेंबर १९३१)
२०१२ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, समाजवादी राजकारणी आणि उत्तरप्रदेश, ओडिशा आणि पश्चिम बंगालचे माजी राज्यपाल बी. सत्य नारायण रेड्डी यांचे निधन.
२०१५ : हंगेरी देशाचे पहिले अध्यक्ष अरपॅड गॉन्कझ यांचे निधन. (जन्म: १० फेब्रुवारी १९२२)

# लाडक्या सिस्टरला न्याय मिळवण्यासाठी मंत्री गिरीश महाजन यांना पत्र

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात सर्व जिल्हा परिषद अंतर्गत २०२३ मध्ये झालेल्या आरोग्य परिचारिका / आरोग्य सेवक महिला पदभरती ही कंपनी मार्फत माहे जुन,जुलै २०२४ दरम्याण महाराष्ट्रभर ऑनलाईन केंद्रावर घेण्यात आल्या.या परिक्षे करिता विवीध जिल्हा परिषदे मार्फत देण्यात आलेल्या जाहिराती मध्ये शैक्षणिक पात्रतेच्या अटी मध्ये 'ज्यांची अर्हता प्राप्त सहकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परचिर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील असे नमुद करण्यात आलेले होते.त्या प्रमाणे राज्य भरातुन व झालेल्या विद्यार्थ्यांचे फॉर्म भरून घ्येण्यात आले व परिक्षाही घेण्यात आल्या. महोदय यानंतर सदर विद्यार्थ्यांची निवड यादी व त्यानंतर कागदपत्र पडताळी बाबतची यादी जिल्हा परिषदांमार्फत लावुन विद्यार्थ्यांची त्याप्रमाणे कागदपत्र पडताळणी करण्यात आली. परंतु या नंतर अचाणक काही जिल्हयामध्ये व झालेल्या विद्यार्थीनी जिल्हा परिषद अधिनीयम १९६७ अन्वये आपणास अपात्र करण्यात येत आहे अशी निवड यादी अकोला व जालना इ जिल्हा परिषदां मार्फत लावण्यात आली.



महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवाप्रवेश (निवड मंडळाच्या सल्याशिवाय) नियम, १९६५ च्या नियम ४ अन्वये करण्यात येणाऱ्या नेमणुकांच्या बाबतीत आणि निवड मंडळाशी संबंधित इतर बावतीत मुख्य कार्यकारी अधिकारी ज्यावेळी विहित केलेली अर्हता धारण करणारे पात्र उमेदवार उपलब्ध नाहीत,असे प्रमाणपत्र देतील अशा वेळी संबंधित विभागीय आयुक्त या नियमात अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त,अशा प्रत्येक प्रकरणांमध्ये,जिल्हा सेवांतील पदावरील नेमणुकीसाठी विहित करण्यात आलेल्या सर्व अर्हता किंवा त्यापैकी कोणतीही अर्हता कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या वर्गाच्या संबंधात शिथिल करण्यास नियुक्ती प्राधिकाऱ्यास परवानगी देऊ शकतील. त्याच जिल्हापरिषद अधिनीयम १९६७ अन्वये सदरील पदा करिता नमुद करण्यात आलेल्या शैक्षणिक अटी मध्ये परिशिष्ठ पाच (दोन) (अ) भारतीय परिचर्या परिषदेने मान्यता दिलेलली परिचर्या ही पदवी धारण करीत असतील किंवा (ब) अर्हता प्राप्त परिचारिका प्रसाविका किंवा अर्हता प्राप्त परिचारीका असतील आणि (तीन) ज्यांची महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झाली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल असे स्पष्ट नमुद करण्यात आलेले आहे. याकारणास्तव कोणतेही व विद्यार्थी अपात्र ठरविता येणार नाहीत.ही परीक्षा व्यतिरिक्त दुसरी कोणासाठी न्हवती तर शासनाने आमचे अर्ज का स्वीकारले. आरोग्य परिचारीका (आरोग्य सेवक महिला) ज्यांची अहार्त प्राप्त सहयाकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचार्या परिषदेंमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अश्या जे पात्रअसतील.वरील अधोरिकित केलेल्या वाक्यांमूळे असे स्पष्ट होते की महाराष्ट्र परिचार्या परिषदेमध्ये नोंदणी असलेले पात्र उमेदवार आहेत. तसेच हा मुद्दा जाहीर केला नाही किंवा उच्चशिक्षीत डिग्री मान्य नाही याची स्पष्ठता दिली नाही दोन अर्थ असलेली जाहिरात हे समजना कठीण आहे. तरी ग्रामविकास मंत्री मा गिरीश महाजन यांनी सदरील विषयी सर्व उच्च शिक्षीत बेरोजगार असलेल्या महिलांचा व गुणवत्तेचा विचार करून त्याना सर्वांना निवड यादी प्रमाणे नियुक्ती देवुन उपकृत करावे अशी विनंती आप चे महाराष्ट्र संघटन मंत्री प्रदिप थोरवे यांनी केली आहे.

## नवरात्र महोत्सवानिमित्त मोफत औषधी व मधुमेह तपासणी



अंबड । प्रतिनिधी

रोटरी क्लब अंबड, रिटेल अँड होलसेल केमिस्ट असोसिएशन अंबड व उपजिल्हा रुग्णालय अंबड,यांच्या संयुक्त विद्यमानाने, नवरात्र महोत्सवानिमित्त मत्सोदरी देवीच्या दर्शनासाठी लाखो भाविक भक्त येत असतात या सर्व भाविक भक्तांना, मोफत मधुमेह तपासणी, मोफत औषधी, मोफत उपचार रोटरी क्लब अंबड व रिटेल अँड होलसेल केमिस्ट असोसिएशन अंबड यांच्या वतीने नऊ दिवस करण्यात एणार आहे.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी, संस्थानाचे अध्यक्ष तहसीलदार विजय चव्हाण , डॉ सुरेश साबू व डॉ साबू मॅडम, रोटरी क्लबचे पंकज पाटणी,रिटेल अँड होलसेल केमिस्ट असोशिएशन जालना जिल्हाध्यक्ष साईनाथ पवार,उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉ टाकसाळ मॅडम, राठोड मॅडम,प्रदीप कराड,डॉ सेठिया,डॉ शेठीया मॅडम ,जितेंद्र लखोटिया, शिवाजी बजाज, डॉ योगेश ढेंबरे,बबलू चौधरी,भाऊसाहेब तौर, तुकाराम डोंगरे, प्रशांत मस्के, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाला, रिटेल अँड होलसेल केमिस्ट असोसिएशन तालुकाध्यक्ष योगीराज खरात, रामेश्वर गिराम, राजेश चतुर, अण्णासाहेब उबाळे, दत्ता शिनगारे, ऋषिकेश भवर, प्रोजेक्ट चेअरमन डॉ अभय जाधव, रोटरी क्लब अंबडचे, अध्यक्ष डॉ लक्ष्मण सावंत, सचिव डॉ केशव मुरकुटे, ऋषिकेश गिल्डा, राजकल करवा, डॉ रोहित भाला, डॉ बागुल डॉ पाटेकर प्रा डॉ पालेकर सर , संतोष शिनगारे,लालू सावंत विष्णू सावंत ,संभाजी बारहाते,प्रवीण वराडे,शिवम फाटक व सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी प्रायोगिक तत्त्वावर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये काही पेशंटला मेडिसिन वाटप करण्यात आले व उपस्थित पेशंटची मधुमेह तपासणी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली. त्याअगोदर कार्यक्रमास विशेष उपस्थित म्हणून प्रमुख पाहुणे लाभलेल्या सर्व मान्यवरांचे शाल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

# भगवानभक्तीगड बहुजन समाजाचे शक्तीपीठ - ॲड.तांदळे

बीड । प्रतिनिधी

ऐश्वर्य संपन्न राष्ट्रसंत वै.भगवान बाबा यांनी सन १९५१ पासून भगवान गड येथे सुरू केलेला पारंपारिक दसरा मेळावा.बाबानी सुरू केलेल्या दसरा मेळाव्याची परंपरा त्यांच्या नंतर वै.भिमसिंह महाराज यांनी चालू ठेवली.लोकनेते स्व.गोपीनाथ रावजी मुंडे साहेब या मेळाव्याला उपस्थित राहून संपूर्ण बहुजन समाजाला दिशा देण्याचे कार्य करत असत हाच त्यांचा वारसा पुढे चालवत दसऱ्याची परंपरा लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी भगवान बाबा यांचे जन्मगाव सावरगाव घाट ता.पाटोदा येथे सुरू केली आहे.

भगवान बाबा यांच्या संदेशा नुसार समाज शिकला पाहिजे, समाजाची प्रगती झाली पाहिजे, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा खंडित झाल्या पाहिजेत हेच खरे दसरा साजरा करण्याचे प्रतिक होय.त्याच नुसार पंकजाताई ह्या





माध्यमातून बाबांचा संदेश सर्व समाजा पर्यंत पोहचविण्याचे काम करत आहेत.आपला दसरा मेळावा म्हणजे भक्ती आणि शक्ति चा संगम आहे.या मेळाव्याला महाराष्ट्रातून तसेच देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक भगवान बाबा,स्व.मुंडे साहेब यांचे आशिर्वाद घेण्यासाठी तसेच लोकनेत्या पंकजाताई यांचे विचार ऐकण्यासाठी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहतात.या मेळाव्यास शेतकऱ्यापासून ते उद्योगपती पर्यंत, ऊसतोडणी कामगारापसून ते कारखानदारापर्यंत, राजकीय नेते मंडळी, वारकरी संप्रदाय, अधिकारी, विद्यार्थी, महीला, आबालवृद्ध, सर्व स्तरातील लोक आपल्या पदाचा बडेजाव पणा बाजूला ठेऊन भगवान बाबा यांचे भक्त म्हणून सामील होतात. या मेळाव्यास लोक स्वखर्चाने,निस्वार्थी भावनेने एकत्र येतात हेच या दसरा मेळाव्याचे वैशिष्ट्य होय. पंकजाताई यांनी म्हटल्या प्रमाणे एक दशक विश्वासाचे,एक दशक परंपरेचे,एक दशक प्रचंड गर्दीचे,एक दशक त्याच गर्दीच्या सीमोल्लंघनाचे,त्यामुळे सर्वांनी शनिवार दिनांक १२. ऑक्टोबर रोजी लाखोच्या संख्येने मेळाव्यास उपस्थित रहावे असे आवाहन भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा जिल्हा सरचिटणीस ॲड.सर्जेराव तात्या तांदळे यांनी केले आहे. लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली दसरा मेळावा संपन्न झाल्यानंतर त्याठिकाणी पाण्याच्या रिकाम्या बाटल्या,खाद्य पदार्थ खाऊन टाकलेले पेपरचे तुकडे, कॅरीबॅग,झालेला कचरा हा सर्वांनी थांबून संपूर्ण परिसर स्वच्छ करावा तसेच स्वच्छता अभियान राबवावे असे आवाहन कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांना ॲड.तांदळे यांनी केले आहे.

# पत्नीचा खून केल्या प्रकरणी कारावासाची शिक्षा झालेल्या पतीची खंडपिठाकडून मुक्तता

बीड । प्रतिनिधी

मूल होत नाही या कारणावरून दारूच्या नशेत पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करत मानसिक आणि शारीरिक छळ करणाऱ्या पतीने पत्नीच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून देऊन पत्नीचा खून केल्याच्या आरोपावरून मा.अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव यांनी भादवी ३०२ मधून मुक्त करून भादवी ४९८अ नुसार सश्रम कारावासाच्या ठोठावलेल्या शिक्षेतून आरोपी पतीची उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने निर्दोष मुक्तता केली.

इब्राहिम खान पठाण रा. गंगामसला तालुका माजलगाव जि.बीड हा जिल्हा परिषद शाळेमध्ये शिक्षक पदावर नोकरी करीत होता त्याचा मेहरूनिसा बरोबर २२ वर्षांपूर्वी विवाह झाला होता. मेहरुनिसाला मूल होत नाही या कारणावरून तिचा पती इब्राहिम पठाण हा दारूच्या नशेत शिवीगाळ करीत मारहाण करत मानसिक व शारीरिक छळ करून पत्नीच्या चरित्रावर संशय घेत असे. १७ डिसेंबर २००१ रोजी सात च्या सुमारास आरोपी पती दारू पिऊन आल्यामुळे पति पत्नीमध्ये भांडण झाले.

यावेळी पती इब्राहिम याने पत्नी मेहरूनिसा च्या अंगावर राकेलचा कॅन ओतला व तिला पेटवून दिले त्यात मेहरूनिसा जळाली असा जबाब मेहरूनिसाने पोलिसांना दिला यावरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल केला मेहरूनिसा ला उपचारासाठी जिल्हा सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले व उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला त्यामुळे आरोपी विरुद्ध कलम ३०२ भा.द.वी प्रमाणे पोलिसांनी गुन्हा दाखल केला .सदर प्रकरणाचा तपास करून पोलिसांनी मा. अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव यांच्या न्यायालयात कलम४९८ अ आणि ३०२ नुसार दोषारोपपत्र दाखल केले .सदर प्रकरण माननीय अतिरिक्त सत्र न्यायालय माजलगाव येथे सुनावणीला आले असता आरोपीची ३०२ भादवी मधून निर्दोष मुक्तता केली परंतु कलम ४९८अ नुसार आरोपीस तीन वर्षाचा सश्रम कारावास आणि दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती. सदर निकाला विरुद्ध आरोपी इब्राहिम पठाण याने माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे फौजदारी अपील क्रमांक ६०८ /२००५ नुसार प्रकरण दाखल केले .सदर अपिलाच्या सुनावणी नंतर मा. न्यायमूर्ती श्री वाघवसे यांनी अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निर्णय रद्द ठरवून आरोपीची निर्दोष मुक्तता केली. सदर प्रकरणी आरोपीची बाजू प्रसिद्ध विधीज्ञ अँड राजेंद्र हंगे अँड अनिरुद्ध हंगे अँड हर्षवर्धन हंगे यांनी मांडली.

# रमाई घरकुलसाठी ५ लाख अनुदान करा- मनोज मस्के

बीड । प्रतिनिधी

रमाई घरकुल आवास योजना शहरी व ग्रामीण अनुदानात प्रत्येकी ५ लाख रुपये वाढ करण्यात यावी या मागणीचे निवेदन केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांना मनोज उर्फ नाना यांनी निवेदन देऊन केली मागणी.बऱ्याच वर्षापासुन रमाई घरकुल आवास योजना शहरी व ग्रामीण भागात कार्यरत आहे. लाखो मागासवर्गीय कुटुंबीयांनी याचा लाभ देखील घेतलेला आहे. ज्यानुसार शहरी भागासाठी २,५०,०००/- रक्कम (पैकी कपात होऊन मिळणारी रक्कम २,३१,२५०/-) मिळत आहे तसेच ग्रामीन भागासाठी १,५०,०००/- रुपये (पैकी कपात होऊन मिळणारी रक्कम १,३२,०००/-) लाभार्थ्यांना मिळत आहे.

तरी महागाइई निर्देशांकानुसार सध्या बाजारात लोखंड, सिमेंट, वीट, वाळु,व बांधकामासाठीची मजुरी खूप मोठया प्रमाणात वाढलेली आहे. शहरी भागासाठी अडीच लाख रुपये तर ग्रामीण भागासाठी दीड लाख रुपये दिले जातात ही रक्कम सध्या तुटपुंजी पडत आहे. सर्व वस्तुंचे भाव वाढल्यामुळे



रमाई घरकुल आवास योजनेचे स्पप्नातील घर बांधने अशक्य झाले आहे.तरी मा. मंत्री या सर्व गोष्टींचा विचार करुन शहरी व ग्रामीण भागात फरक न करता प्रत्येकी पाच लाख रुपये घरकुल अनुदन निधी वाढ करावी अशी मागणी या निवेदनातून करण्यात येत आहे. निश्चितपणे वाढ झाली तर अनेकांची स्वप्नातील घरकुल बांधण्याची स्वप्नपुर्ती होऊ शकते. तरी या मागणीच्या निवेदनाचा याचा सहानुभुतीपुर्वक विचार करावा व निर्णय घ्यावा.अशी मागणी करण्यात आली आहे.

## शोभायात्रेने झाला भागवत कथा, किर्तन महोत्सवास प्रारंभ

गेवराई। प्रतिनिधी

माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्या निमित्ताने गेवराई शहरात आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद्? भागवत कथा आणि कीर्तन सोहळ्याचा प्रारंभ भव्य दिव्य शोभायात्रेने झाला. राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव या विषयांसह भक्तीमय संदेश देणारे देखावे, दिंडी आणि हरिनामाचा गजर करत विविध शाळेतील विद्यार्थी वारकरी या शोभायात्रेत सहभागी झाले होते. शोभायात्रेतील सजवलेल्या रथातून भागवताचार्य आत्मविद्या विशारद बालयोगी हरिहर महाराज दिवेगांवकर यांची मिरवणूक काढण्यात आली. टाळ, मृदंग आणि हरिनामाच्या गजराने गेवराई नगरी दुमदुमली. शोभायात्रेमुळे शहर भक्तीमय झाले होते. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजयसिंह पंडित, युवानेते रणवीर पंडित यांच्यासह अभिष्टचिंतन सोहळा समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध शाळेचे विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने शोभायात्रेत सहभागी झाले होते.

गेवराई तालुक्याचे भाग्यविधाते सहकार व शिक्षणमहर्षी माजी मंत्री शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या ८७ व्या वाढदिवसानिमित्त गेवराई शहरात श्रीमद्? भागवत कथा, भजन संध्या आणि कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाचा प्रारंभ आज सकाळी शोभा यात्रेने झाला. कृषी उत्पन्न बाजार समिती, मोंढा येथून शोभायात्रेला प्रारंभ झाला, मेन रोड, तहसिल कार्यालय, कोल्हेर वेस, पंचायत समिती कॉर्नर मार्गे शिवनगरी अट्टल महाविद्यालय गेवराई या ठिकाणी शोभायात्रेची सांगता झाली.

## माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती सोमवारी एकदिवसीय लाक्षणिक संपावर-नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी

राज्यातील सर्व बाजार समित्यांनी सोमवार दि.०७ ऑक्टोबर रोजी एक दिवशी लाक्षणिक संप पुकारला आहे या अनुषंगाने माजलगाव बाजार समिती एक दिवस संपावर जाणार आहे असे माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती चे सभापती जयदत्त नरवडे ,उपसभापती श्रीहरी मोरे ,सचिव हरिभाऊ सवणे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी उत्पन्न मंडळ व महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी ग. दि. माडगूळकर नाट्यगृह निगडी, चिंचवड पुणे येथे राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन करण्यात आले



होते या परिषदेला राज्याचे माननीय मुख्यमंत्री महोदय व दोन्ही उपमुख्यमंत्री महोदय तसेच माननीय पणन मंत्री उपस्थित राहून मार्गदर्शन करणार होते परंतु राज्य मंत्रिमंडळाची बैठक असल्याने माननीय मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री उपस्थित राहू शकले नाहीत राज्याचे पणन मंत्री म्हणून अब्दुल सत्तार हे परिषदेस उपस्थित राहण्याकरिता आले व राज्यातील बाजार समितीच्या प्रतिनिधीचे कोणतेही म्हणणे अडचणी, प्रश्न न ऐकता व त्यावर उपाययोजना न करता व शासनाचे मत न मांडता परिषदेच्या सभासदाळावरून निघून गेले त्यामुळे आपल्या प्रश्नांचा विचार केला नाही म्हणून तेव्हा लगेच सभास्थानी पणन मंत्री अब्दुल सत्तार यांचा जाहीर निषेध करण्यात आला व दि.०७ ऑक्टोबर रोजी एक दिवशी राज्यातील सर्व बाजार समितीचे कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला याच अनुषंगाने माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती मधील सर्व बाजार घटकांनी या एक दिवसीय लाक्षणिक संपामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन सभापती जयदत्त नरवडे,उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे

# भारत देश महापुरुषांच्या त्यागावर उभा आहे - माया सोनवणे

पाटोदा । प्रतिनिधी

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली शस्त्रविरहित क्रांतीचा उदय झाला. त्यांच्या विचारांचा खोलवर विचार करता ते एक सर्वव्यापी व्यक्तिमत्व होते. स्वातंत्र्य आंदोलने आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ महात्मा गांधींनी उभी केली होती. लालबहादूर शास्त्रींनी युवावस्थेतच स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला व तुरुंगवास भोगला. म्हणून देश आज गांधीजी व शास्त्रीजी यांच्यासारख्या नेत्यांच्या त्यागावर उभा राहिला आहे, असे प्रतिपादन बीडच्या छत्रपती राजर्षि शाहू कन्या विद्यालयाच्या शिक्षिका माया सोनवणे-दिवान यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्थेच्या वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने म. गांधी जयंती, लालबहादूर शास्त्री जयंती तसेच संस्थेच्या संस्थापिका कै. सौ. केशरबाई क्षीरसागर यांच्या १८ व्या पुण्यस्मरणाच्या निमित्त ४ ऑक्टोबर रोजी आयोजित विशेष व्याख्यानात त्या प्रमुख वक्ता म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. व्यासपीठावर



उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, कम. उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड उपस्थित होते. प्रारंभी महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्री व कै. सौ. केशरबाई क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पमाल्यार्पण करण्यात आले.आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानात माया सोनवणे यांनी स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या योगदानाबद्दल सविस्तर माहिती देत कै. केशरबाई क्षीरसागर यांच्या राजकीय व शैक्षणिक कार्याची मिमांसा केली. विद्यार्थ्यांना संदेश देताना त्या म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी आपले ध्येय व आई-वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेऊन आयुष्याचा एकेक क्षण अभ्यास करण्यासाठी घालवावा. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे म्हणाले की सकारात्मक विचारांमुळेच थोर व्यक्तींनी परिवर्तन घडवून आणले. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक ग्रंथांचे वाचन करावे ज्यामुळे विचार प्रगल्भ व सकारात्मक होतील.सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. सोमनाथ लांडगे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. शरद पवार यांनी केले. अतिथी वक्त्यांचा परिचय प्रा. विठ्ठल शिंदे यांनी दिला. आभार डॉ. काकासाहेब पोकळे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## हमीभावाने सोयाबीन, मुग, उडीद विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी करावी-तांबोळी

आष्टी । प्रतिनिधी

हंगाम २०२४-२५ मध्ये केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत माजीमंत्री सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने नाफेड च्यावतीने आष्टी तालुक्यातील सोयाबीन, मूग,उडीद उत्पादक शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती कडा येथे शासकीय खरेदी केंद्रावर आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन नोंदणी सुरू झाली असून शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे .

कडा कृषी उत्पन्न बाजार समिती येथे माजी मंत्री सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने जामगाव सेवा सोसायटीला शासकीय हमीभाव खरेदी केंद्रांस मंजुरी मिळाली आहे.शेतकऱ्यांनी सातबारा,आधारकार्ड,बँक पासबुक,ऑनलाइन पिकपेरा





प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रासह प्रत्यक्ष येऊन नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे. सध्या खाजगी व्यापारी हमीभावापेक्षा कमी भावाने माल खरेदी करत असून शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन ४८९२,मुग ८६८२,तर उडीद ७४०० रुपये प्रतिक्विंटल असा भाव मिळणार असून शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे.मुग व उडीद खरेदीचा कालावधी ७ जानेवारी २०२५ तर सोयाबीन खरेदीचा कालावधी १२ जानेवारी २०२५ पर्यंत असणार आहे.


### जाहिर प्रगटन
**मा. श्री.व्ही.सी.जोशी १ ले दिवाणी न्यायाधीश क स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १३३१/२०२४**

**सुलोचनाबाई जानकीराम पवार वि. निरंक**

ज्यापेक्षा **जानकीराम विश्वनाथ पवार**, हे दिनांक १०.०७.२०२४ रोजी रा. रविवार पेठ, तेली गल्ली, बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार १ सुलोचनाबाई भ्र. जानकीराम पवार, वय ७० वर्षे, बंदा घरकाम, रा रविवार पेठ, तेली गल्ली, बीड, ता.जि. बीड. २. दशरथ पि. जानकीराम पवार, वय ४५ वर्षे, धंदा शेती रा रविवार पेठ तेली गल्ली बीड, ता.जि.बीड. ३. दिगांबर पि. जानकीराम पवार, वय ३६ वर्षे, धंदा शेती, रा रविवार पेठ, तेली गल्ली बीड, ता.जि.बीड ४. शिवकन्या भ्र. रामभाऊ शिंदे, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा.भनंग जळगाव ता.जि.जालना. अर्जदार क्र. १ ही मयत नामे जानकीराम विश्वनाथ पवार यांची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत तर अर्जदार क्र . ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क गावीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहू मयत जानकीराम विश्वनाथ पवार यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख १४/१०/२०२४ आहे. आज दिनांक १० साप्टेंबर रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

मार्फत
**ॲड.आर.आर. शिंदे**

(शिक्का)

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व स्तर बीड

राज्य लोकतंत्र

रविवार, दि.६ ऑक्टोबर २०२४



# फूट क्लिनिकच्या माध्यमातून ३० बालकांची दिव्यांगापासून मुक्ती

## क्युअर इंडिया आणि स्वारातीचा उपक्रम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या क्युअर इंडिया आणि स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणा-या ''फूट क्लिनीक'' या उपक्रमाच्या माध्यमातून ३० बालकांची दिव्यांगापासून मुक्ती करण्यात आली आहे . यामुळे ग्रामीण भागातील सामान्य रुग्णांना याचा फायदा होत आहे.

जन्मतःच वाकडी पाय असलेल्या बालकांवर सात दिवसाच्या आत उपचार केल्यास त्यांचे पाय बरे होतात. याची माहिती नागरिकांना मिळावी यासाठी राष्ट्रीय पातळीवर काम करणारी दिल्ली येथील क्यूर इंडिया संस्था बीड जिल्ह्यात काम करत आहे. त्याच्या समन्वयक अश्विनी पांचाळ आहेत. आशा वर्कर यांच्या माध्यमातून पांचाळ जिल्ह्यातील दिव्यांग मुलं शोधून अंगणवाडीच्या माध्यमातून त्या मुलांना रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्याचे काम करतात.

अश्या दिव्यांग बालकांवर खाजगी रुग्णालयात उपचार करण्यासाठी १० हजार ते १ लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च येतो मात्र फूट क्लिनिक'' च्या माध्यमातून सर्व उपचार मोफत दिले जातात. आजपर्यंत भारतात दिव्यांग असलेल्या १ लाख मुलांवर मोफत उपचार करून ते पूर्णतः बरे झाले आहेत. त्याचं अपंगत्व नष्ट झाले आहे. या बालकांना लागणारे शूज हे क्यूर इंडिया मोफत देते. तसेच डॉक्टरांना प्रशिक्षण देखील दिले जाते अशी माहिती क्यूर इंडियाच्या





बीड जिल्हा समन्वयक अश्विनी पांचाळ यांनी दिली आहे.

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात मार्च २०२३ ला फूट क्लिनिक'' सुरू करण्यात आले. या ठिकाणी आठवड्यात दोन वेळा दिव्यांग असलेल्या बालकांवर उपचार करून त्यांना मार्गदर्शन करण्यात येते. मागील १ वर्षात ज्या बालकांचे पाय पूर्णपणे वाकडी होती ज्यांना भविष्यात चालणं शक्य नव्हते अश्या ५१ बालकांवर उपचार सुरू असून यातील ३० बालके पुर्णतः १००% बरी झाली. आज ते आपल्या पायावरती चालत आहेत.

माझ्या लेकरावर उपचार करण्यासाठी पैसे नव्हते मात्र आशा वर्करच्या माध्यमातून मला माहिती मिळाली त्यानंतर मी क्यूर इंडिया च्या पांचाळ मॅडम यांना भेटले. त्यांनी मला मार्गदर्शन केले आणि मी माझ्या लेकरावर स्वाराती रुग्णालयात असलेल्या फूट क्लिनिक मध्ये उपचार केले या ठिकाणी पुर्णतः मोफत उपचार झाले,आज माझं लेकरु चालत आहे.,असं कुंबेफळ येथील लाभार्थी यांनी सांगितले आहे.

ज्या लहान मुलांना अपंगत्व येते अश्या मुलांवर फूट क्लिनिक मध्ये उपचार केले जातात यासाठी क्यूर इंडिया संस्था स्वाराती रुग्णालयातील डॉक्टरांना प्रशिक्षण देते. रोटरी क्लब प्लास्टरचा खर्च करतो,डॉ. दीपक लामतुरे व त्यांची टीम मुलांवर उपचार करते, या बालकांना क्यूर इंडिया मोफत बूट देते, आजपर्यंत ५१ बालकांवर उपचार सुरू असून यातील ३० बालके पूर्णतः बरी झालेली आहेत, अशी माहिती स्वाराती रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी दिली आहे.

क्लब फूट किंवा सीटीव्हीचे जे बच्चू असतात त्यांना जन्मताच पायामध्ये अपंगत्व आलेलं असत, आई वडिलांना जर अश्या पध्दतीने अपंगत्व असेल तर त्यांच्या मुलांमध्ये असं अपंगत्व येणाची दाट शक्यता असते लहान मुलं जन्मल्यानंतर सात दिवसानंतर उपचार करायला हवे,तीन महिने उशीर झाला तर असे बच्चू बरे होणार नाहीत त्यांचे पाय आहे तसेच वाकडे राहतात,लवकर उपचार केल्यास बिना ऑपरेशनचे पाय सरळ होतात यासाठी क्यूर इंडिया आम्हला मार्गदर्शन करते अशी माहिती अस्थीरोग विभागाचे प्रमुख डॉ. दीपक लामतुरे यांनी दिली आहे.

# हनुमान नगर दांडियाचा स्तुत्य उपक्रम-संकेत मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील हनुमान नगर मधील छत्रपती गणेश मंडळ आयोजित नवरात्र दांडिया उत्सवात आदर नारी शक्तीचा उपक्रम राबविण्यात येत असून दररोज ९ महिलेचा सत्कार केला जात आहे. खरोखरच महिलेंसाठी ही सन्मानाची बाब असून स्तुत्य उपक्रम आहे असे मत युवा नेते संकेत मोदी यांनी व्यक्त केले.

हनुमान नगर येथील छत्रपती गणेश मंडळ आयोजित नवरात्र दांडिया उत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून संकेत भैय्या मोदी यांच्या हस्ते अंबाजोगाई चे ग्राम दैवत श्री



योगेश्वरी देवी व जगत जगदंबा तुळजा भवानी मातेची आरती करण्यात आली.यावेळी बोलतांना त्यांनी हनुमान नगर दांडिया च्या नारी शक्ती

पान ३ वर



**बीड – केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले बीड येथे सत्कार सोहळ्यास आले असता त्यांनी राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष तथा समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांच्या हॉटेल सनराईजला सदिच्छा भेट दिली. यावेळी हॉटेलचे व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांनी त्यांचा सत्कार करून स्वागत केले. यावेळी युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांची उपस्थिती होती.**

# माणूसकी सेवा फाऊंडेशनच्या वतीने महेश शिंदे यांचा सत्कार



**बीड । प्रतिनिधी**

महेश भाऊ शिंदे माणुसकी सेवा फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महेश शिंदे यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस( अजित पवार गट ) पक्षाचे प्रवक्ते पदी निवड झाल्याबद्दल माणुसकी सेवा फाऊंडेशनचे जिल्हा अध्यक्ष मस्के सर यांनी त्यांचा सत्कार केला.

यावेळी युवा जिल्हा अध्यक्ष सोनवणे संघपाल जिल्हा उपाध्यक्ष गंगावणे अंकुश, जिल्हा सचिव ढोकणे विठ्ठल, जिल्हा सहसचिव खेमाडे पान ३ वर

# बीड शहर पोलीसांनी पकडली अवैध शिंदी दारु, आरोपीकडून एक तलवारही जप्त

बीड । प्रतिनिधी

शहर पोलिस स्टेशनचा डिबी पथकास अशी माहिती मिळाली की राजुरी वेस डीसीसी बँकेचे पाठीमागील बाजूस एका पत्र्याच्या खोलीमध्ये दोन इसम सिंधी ताडी दारू विकत असून त्यांच्याजवळ तलवार असून ते दहशत करीत आहेत.

अशी माहिती मिळताच प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक निकम साहेब, रियाज शेख, पोलीस नाईक वायकर, पोलीस शिपाई परजणे, पोलीस शिपाई सय्यद, असे बातमी मिळालेल्या



ठिकाणी १२:१० वाजता जाऊन छापा मारला असता सदर ठिकाणी दोन इसम सुनील बन्सी भोसले रा बबलेश्वर मंदिराजवळ धोंडीपुरा बीड व अक्षय बंडू भेटे रा पोस्टमन कॉलनी अंबिका चौक शाहूनगर हे मिळून आले त्यांच्या ताब्यात २०० लिटर सिंधी ताडी तयार दारू, एक लोखंडी तलवार असा एकूण २१०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळून आला. सदर इसमावर पोलीस स्टेशन बीड शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरील कारवाई,पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे, बीड आणि पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

# दिंद्रुडचे प्राथमिक आरोग्य केंद्र आदर्शवत असेल – डॉ.ओमप्रकाश शेटे

### प्रा. आ.केंद्रात बाह्यरुग्ण विभाग कार्यान्वित

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

दिंद्रुड येथे नवीनच बांधण्यात आलेले प्राथमिक आरोग्य केंद्र सर्व सोयीने परिपूर्ण व आदर्शवत होण्यासाठी शासकीय निधी सोबतच सी एस आर मधून पैसा उपलब्ध केला जाईल असे प्रतिपादन आयुष्मान



भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी केले. दिंद्रुड येथील प्रा.आ.केंद्रातील बाह्यरुग्ण विभागाचे उद्घाटन आ. प्रकाशदादा सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. शेटे बोलत होते.

मागील दोन वर्षांपासून बांधकाम पूर्ण होऊनही प्रलंबित असलेल्या दिंद्रुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्घाटन शनिवारी करण्यात आले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे, सपोनि अण्णाराव खोडेवाड, माजी सरपंच अजय कोमटवार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राथमिक आरोग्य केंद्रात पंचक्रोशीतील पान ३ वर

# राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ईच्छूक उमेदवारांच्या मुलाखती

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान सभा निवडणूकीचे स्वयंवर जवळ येऊन ठेपले आहे.सर्वच पक्ष वर चाचपणी करत आहेत.

राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पक्षाच्या वतीने निसर्ग मंगल कार्यालय,मार्केट यार्ड पुणे येथे खा.शरदचंद्र पवार यांचे सह पक्षाचे पार्लमेंट्री बोर्ड दि.५ ते ७ ऑक्टोबर २०२४ दरम्यान सर्व ईच्छूक उमेदवारींच्या मुलाखती घेत आहे. पान ३ वर



**पवार निष्ठावंतांना न्याय देणार की फितूरांना पायघड्या घालणार? जनतेच्या मनातील प्रश्न**

# वडवणीत रेणुका मातेच्या दर्शनासाठी भाविकांचा ओघ

## बुधवारी मातेची पालखी मिरवणूक तर शनिवारी रावण दहन



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी परिसराच्या पंचक्रोशीत नवसाला पावणारी माता म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील भाविक-भक्तांची आराध्यदैवता श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी यंदाही मोठ्या जल्लोषात व हर्षोल्हासात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. गुरुवार रोजी घटस्थापनेने या नवरात्रोत्सवास सुरुवात झाली आहे. तसेच बुधवार रोजी सातव्या माळेच्या दिवशी मातेची पालखी मिरवणूक मंदिर ते संपूर्ण गाव अशी हलकीच्या व टाळमृदंगाच्या गजरात संपन्न होणार असून शनिवारी विजयादशमी दिनी सायंकाळी ठीक ७ वाजता मंदिर परिसरात रावण दहनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी याप्रसंगी वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी व जनतेने उपस्थित राहून या दैदिप्यमान कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मागील वर्षभरापासून वडवणी पंचक्रोशीतील संपूर्ण भाविक भक्तांना ज्या क्षणाची आतुरतेने ओढ होती प्रतिक्षा होती तो क्षण म्हणजे तमाम वडवणीकरांची अराध्यदैवता श्री.रेणुका मातेच्या मनोभावे दर्शनाची. यावर्षीचा नवरात्र महोत्सव दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ गुरुवार रोजी घटस्थापनेपासून सुरु झालेला आहे. या संपूर्ण नवरात्रीमध्ये श्री.रेणुकामाता संस्थान यांच्याकडून मातेची विधिवत पूजाअर्चा व जागर करण्यात येणार असून दैनंदिन देवीचा जागरही करण्यात येत आहे. दरम्यान वडवणी परिसराच्या पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांच्या श्रध्दास्थान असलेल्या तसेच भाविकांच्या नवसाला पावणारी आई म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्यदैवता शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात

पान ३ वर

# एक हजार वर्षापूर्वीचे हेमाड पंथी बांधकामाचे पारगावचे जोगेश्वरीदेवी मंदीर

## सर्वात मोठा नवरात्रोत्सव साजरा करणारे जोगेश्वरीदेवी देवस्थान

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील आष्टीपासून १३ कि.मी.अंतरावर पारगाव जो.येथे जोगेश्वरी देवीचे देवस्थान आहे.निसर्गरम्य ठिकाणी देवीचे मंदिर आहे.हे मंदिर एक हजार वर्षांपूर्वीचे हेमांडपंती बांधकामाचे आहे.संपूर्ण बांधकाम पूर्ण जुने आहे.ते अद्याप सुरक्षित आहे.मंदिर आवारात गावकऱ्यांनी लोकवर्गणीतून मंदिरालगत मोठे सभागृह बांधले आहे.येथे भव्य असा नगारखाना आहे.मंदिराच्या चारही बाजूच्या मजबूत भिंती मंदिराच्या भव्यतेची ओळख करून देतात.मंदिरासमोर मोठी झाडी आहे.परिसर विविध झाडांनी वेलींनी नटलेला आहे.मंदिराच्या दोन्ही बाजूस तलाव असल्याने मंदिराच्या सौंदर्यात आणखीनच भर पडत आहे.यावर्षी पारगांव जो. परिसरात चांगला पाऊस झाल्याने हिरवेगार पिके दिसत आहेत.धरणी मातेने हिरवा शालू पांघरलेला असल्याने नवरात्र उत्सवात हे विलोभनीय दृश्य देवी भक्तांना भुरळ घालणारे आहे.श्री चक्रधरस्वामी हे महानुभाव पंथाचे संस्थापक यांनी या परिसरात भ्रमंती केल्याची आख्यायिका आहे.याठिकाणी अनुसया यांनी पूजा व सार पूजा केली होती ते हे स्थळ आहे.पारगांव जोगेश्वरी मंदिरात मराठी भाषेतील ग्रंथ लीळाचरित्र आहे.माहीमभटाने श्री चक्रधरांची लिहिलेले ते चरित्र एकत्रितरीत्या येथे सांगितले आहे श्री चक्रधर स्वामींनी या मंदिरासंबंधी





सांगितले आहे की, मंदिराच्या बाहेर एक दगडी छत्री आहे.त्यांना मंदिरात जाता येत नाही ते लोक येथूनच दर्शन घेतात. मंदिरांमध्ये लक्ष्मीनारायणाच्या सुंदर अशा मूर्ती पूर्वाभिमुख आहे.

' मंदिर कैसे निके मंदिर '' मंदीर किती सुंदर आहे '' या ओळीचा संदर्भ या निश्चितीसाठी उपयोगी पडतो चक्रधर स्वामी यांच्या पूर्वी हे मंदिर अस्तित्वात होते किमान एक हजार वर्षापूर्वीचे हे मंदिर आहे. हिंदूची देवी आणि महानुभव पंथाची पूजा स्थळ म्हणून ओळखले जाते.मंदिराचे प्रस्तावावर बांधलेल्या रुंद भिंती सभामंडप गाभारा सगळे कसे प्रसन्न वातावरणात आहे.देवीचा मुखवटा तांदळाचा हे काही भक्तगणांना प्रथम दर्शनी हा मुखवटा भुरळ घालतो.मंदिराच्या प्रत्येक दगडावर वेलबुट्टी आहे काही दगडावर हत्ती अश्व युद्धाचे काही प्रसंग कोरलेले आहेत.या मंदिराच्या दारावर एक शिलालेख आहे.हा लेख आज पुरातन नाही इतर शिलालेखांचे स्वतंत्र नोंदी आहेत मात्र या शिलालेखाचा कुठेही उल्लेख झालेला नाही.ऊन वारा पाऊस यांना सामना देणारे हे मंदिर आजही चांगल्या स्थितीत उभे आहे.देवीच्या साडेतीन पीठांपैकी अंबाजोगाई येथील योगेश्वरी देवीचे ही उपस्थान असल्याची आख्यायिका सांगण्यात येते. पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyalokatanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# भाजपाची मुघलशाही सहन करणार नाही ; छत्रपती संभाजीराजे यांचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील शिवस्मारकाचा शोध घेण्यासाठी महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या वतीने शिवस्मारक शोधमोहीम पुकारण्यात आली आहे. मुंबई पालिका प्रशासन, पोलीसांनी बोर्ड काढले, टेम्पो जप्त केले, कामगारांना मारहाण केली आहे. भाजपाची ही मुघलशाही सहन करणार नाही, असा इशारा छत्रपती संभाजीराजे यांनी पत्रकार परिषदेत दिला.



महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या वतीने आयोजित या पत्रकार परिषदेला पक्षाचे सरचिटणीस डॉ. धनंजय जाधव उपस्थित होते. छत्रपती संभाजीराजे म्हणाले, २०१६ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबई महापालिकेच्या निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर शिवस्मारकाचे जलपूजन केले होते. परंतु ८ वर्षे झाले तरी कोणतेही काम झालेले नाही. प्रत्यक्षात कामही सुरु झालेले नाही, मात्र शेकडो कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला आहे. याबाबत स्वराज्य पक्षाच्या वतीने 'भाजपा - शिवसेना सरकारचे हेच का अच्छे दिन?' अशा अशायचे बॅनर मुंबई, पुणे सह संपुर्ण महाराष्ट्रभरात लावण्यात आले होते. त्याचबरोबर दि. ६ ऑक्टोबर रोजी शिवस्मारक शोधमोहीम ही आखण्यात आली आहे. परंतु मुंबई पालिका प्रशासन, पोलीसांनी बोर्ड काढले, टेम्पो जप्त केले, कामगारांना मारहाण केली. ज्या बोटीतून अरबी समुद्रात जाणार होते त्या बोट मालकांना बोलवून धमकावले. पदाधिकार्यांना नोटीस दिल्या आहेत.

शिवस्मारक पाहणी करण्यासाठी छत्रपती संभाजीराजे पुण्यातून सकाळी ६.३० वाजता स्वराज्य भवन, पुणे येथून निघणार आहेत. त्यानंतर मुकाई चौक रावेत, नवीन एक्स्प्रेसवे मार्गे लोणावळा, नवी मुंबई येथे थांबणार आहेत. नाशिक, मुंबई, पुणे व महाराष्ट्रभरातील कार्यकर्त्यांसह एकत्रितपणे चेंबूरकडे प्रस्थान करणार आहेत. सकाळी ९.३० वा. चेंबूर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाला पुष्पहार अर्पण करुन १० वाजता गेट वे ऑफ इंडिया येथे आगमन होणार आहे. त्यानंतर बोटीने अरबी समुद्रात शिवस्मारकाचा शोध घेण्यास रवाना होणार असल्याचे पक्षाचे सरचिटणीस डॉ. धनंजय जाधव यांनी सांगितले.

राज्याचे ज्येष्ठ नेते म्हणून शरद पवार साहेब यांच्याकडे पाहत आहे. त्यांना आरक्षणाबाबत अधिक अभ्यास आहे. जर आरक्षणाची मर्यादा ७५ टक्क्यापर्यंत वाढवून देता येत असेल तर पवार साहेबांनी यापुर्वीच का नाही दिले? असा प्रश्न उपस्थित करीत छत्रपती संभाजीराजे यांनी शरद पवारांच्या बदलत्या भुमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण केले. आगामी दहा दिवसांमध्ये राज्यात आचार संहिता लागण्याची शक्यता आहे. मनोज जरांगे यांनी उमेदवार पाडण्याचा विचार करण्यापेक्षा उमेदवार निवडुन आणून सत्ता मिळविण्याचा विचार अधिक करणे आवश्यक आहे. आमच्या बरोबर येण्याचा प्रस्ताव त्यांना दिलेला आहे. आमच्या सकारात्मक चर्चा झाल्या असून एकत्र आल्यास सत्ता मिळणे सोपे होईल, असेही छत्रपती संभाजीराजे यांनी यावेळी सांगितले.

पंतप्रधान पदावरील व्यक्ती शिवस्मारकाचे जलपूजन करतात, मात्र त्यापूर्वी परवानगी का घेतल्या जात नाहीत? वास्तविक पाहता सर्व परवानग्या घेऊनच शिवस्मारकाचे जलपुजन अपेक्षित होते. मात्र, राजकारण करण्याच्या हेतूने त्यावेळी घाईघाईत जलपुजन करण्यात आले. गेल्या आठ वर्षापासून पर्यावरणीय निकषांची पुर्तता का केली जात नाही? आदि प्रश्नांची उत्तरे सरकारने द्यावीत. या शिवस्मारक शोधमोहिमेसाठी आमच्या पक्षाचे सर्व कार्यकर्ते जाणारच आहोत. आम्हाला अडवण्याचा प्रयत्न करुन दाखवावा, असा इशाराही संभाजीराजे यांनी यावेळी दिला.

# पोलिसांचे पत्र असेल तरच शेतीकामासाठी कोयता विकत मिळेल !

**पुणे । प्रतिनिधी**

सध्या पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण, मुळशीसह संपूर्ण जिल्ह्यातच कोयता गँगची प्रचंड दहशत आहे. पण याचा परिणाम थेट शेतकर्यांवर झाला आहे. जिल्ह्यातील कोणत्याही हार्डवेअर अथवा शेती अवजारांच्या दुकानात शेतकरी शेतीकामासाठी कोयता खरेदी करायला गेल्यावर त्याला पोलिसांचे पत्र असेल तरच कोयता विकत मिळेल, असे सांगितले जात आहे. इतकेच नाही तर अनेक दुकानदारांनी पोलिसांची ससेमिरा नको म्हणून कोयता विक्रीसाठी ठेवणेच बंद केले आहे. परिणामी शेतकर्याची मोठी अडचण होऊ लागली आहे.



गेल्या काही वर्षांत पुणे, पिंपरी-चिंचवड शहरांसह संपूर्ण जिल्ह्यातच कोयता गँगने धुमाकूळ घातला आहे. या कोयता गँगवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून पोलिसांनी शहर आणि जिल्ह्यातील सर्व हार्डवेअर आणि शेती अवजारे विक्री करणार्या दुकानदारांना सक्त सूचना दिल्या आहेत की, पोलिसांची परवानगी घेतल्याशिवाय कुणालाही कोयता विक्री करू नये. ग्रामीण भागात आजही शेतीच्या अनेक कामांसाठी, सरपण, लाकूडफाटा तोडण्यासाठी कोयत्याशिवाय पर्याय नाही. परंतु हा कोयता घेण्यासाठी शेतकर्यांना मोठे मद्राविडी प्राणायामफ करावे लागत आहेत. १००-२०० रुपयांचा कोयता घेण्यासाठी पोलिस ठाण्याची पायरी चढावी लागत आहे. तर अनेक दुकानदारांनी थेट कोयत्यांची विक्रीच बंद केली आहे. त्याचा थेट परिणाम मात्र शेतकर्यांवर होत आहे.

# 'मसाप'ची कार्यकारीणी घटनाबाह्य

**पुणे । प्रतिनिधी**

'महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विद्यमान कार्यकारिणीची मुदत २०२१मध्येच संपुष्टात आली. या कार्यकारिणीने वार्षिक सर्वसाधारण सभेत मांडलेला पाच वर्षांच्या मुदतवाढीचा ठराव घटनाबाह्य असून, पर्यायाने ही कार्यकारिणीही घटनाबाह्य आहे. त्यामुळे परिषदेची निवडणूक जाहीर करावी', अशी मागणी महाराष्ट्र साहित्य परिषद संरक्षण कृती समितीतर्फे करण्यात आली.

संरक्षण कृती समितीचे अध्यक्ष मिलिंद कांबळे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत याबाबत भूमिका मांडली. याप्रसंगी समितीचे कार्याध्यक्ष प्रा. धनंजय कुलकर्णी आणि निमंत्रक शशांक महाजन उपस्थित होते. 'मसाप'चा कारभार संस्थेच्या घटनात्मक तरतुदींनुसार व लोकशाही मार्गाने व्हावा, यासाठी ही समिती स्थापन केल्याचे कांबळे यांनी सांगितले. समितीच्या या आरोपांबाबत 'मसाप'चे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्याशी संपर्क केला असता ते उपलब्ध होऊ शकले नाहीत.



कांबळे म्हणाले, ''मसापच्या विद्यमान कार्यकारिणीने मांडलेला हा मुदतवाढीचा ठराव बेकायदेशीर आहे. त्यामुळे लगेचच निवडणूक जाहीर करावी. याबाबतची याचिका विजय शेंडगे या सभासदाने धर्मादाय आयुक्त कार्यालयात दाखल केली आहे. त्यावर सुनावणी सुरू आहे. मात्र कार्यकारिणीची मुदत तीन वर्षांपूर्वीच संपुष्टात आल्याने या याचिकेवरील निर्णयाची वाट न पाहता निवडणूक जाहीर करावी, अशी आमची मागणी आहे. ही निवडणूक धर्मादाय आयुक्तांच्या निरीक्षण अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली घेण्यात यावी.''

धनंजय कुलकर्णी म्हणाले, ''कोरोनाचे कारण देत मुदतवाढीचा ठराव करण्यात आला. मात्र, कोरोनाची तीव्रता कमी होत असतानाही वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात आलेला ठराव संस्थेच्या घटनेच्या विरोधात आहे. या ठरावाला अद्याप धर्मादाय आयुक्तांनी मान्यताही दिलेली नाही. त्यामुळे विद्यमान कार्यकारिणीच बेकायदेशीर आहे. या कार्यकारिणीने अनेकांचे सभासदत्वाचे अर्जही प्रलंबित ठेवले आहेत.''

# खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी गजाआड

**पुणे । प्रतिनिधी**

खानापूर (ता. हवेली) मधील खुनाच्या गुन्ह्यातील एका फरार आरोपीला सासवड पोलिसांनी चांबळी येथे अटक केली. श्रीनाथ अशोक बडदे (वय २४, रा. कोडीत) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

हवेली पोलिस ठाण्याच्या हद्दीत घेरा सिंहगड परिसरात १४ सप्टेंबर रोजी रात्री जुन्या भांडणाच्या वादातून सोमनाथ अनंता वाघ (वय २४) याचा गोळ्या घालून खून करण्यात आला होता. याबाबत हवेली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, यापूर्वी पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. सासवडचे पोलिस निरीक्षक हृषिकेश अधिकारी, हवालदार रूपेश भगत, जब्बार सय्यद, गणेश पोटे चांबळी, गराडे, कोडीत भागात गस्त घालत होते. त्यावेळी श्रीनाथ बडदे चांबळी येथे आढळून आला. त्याला हवेली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. हवेली पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक सचिन वांगडे तपास करीत आहेत.

# राहुरी येथील वकील दांम्पत्याच्या हत्येचा पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट्स असोसिएशनच्या वतीने निषेध

***पिंपरी । प्रतिनिधी***

अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी न्यायालयात वकीली क्षेत्रात कार्यरत असलेले अॅड.राजाराम आढाव व त्यांच्या पत्नी अॅड.मनीषा आढाव हे दाम्पत्य गुरुवारी दि.२५ जानेवारी २०२४ पासून बेपत्ता होते. त्यानंतर पोलिसांकडून त्यांचा शोध घेण्यात आला असता या दांम्पत्याची हत्या झाल्याचे उघड झाले. याचा निषेध पिंपरी चिंचवड अॅडव्होकेट्स असोसिएशनच्या वतीने शनिवारी दि.५ रोजी करण्यात आला.

सदर वकील दांम्पत्याचे अपहरण करून हत्या झाली ही अतिशय निंदनीय I असल्याने याचा सर्वत्र निषेध होत आहे. पिंपरी चिंचवड अॅडव्होकेटस् असोसिएशनच्या वतीने पिंपरी न्यायालयातील वकील पुरुष बार रूममध्ये निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सदर वकिल दाम्पत्य हत्येचा तीव्र शब्दात सर्व वकील बंधू - भगिनींच्या वतीने निषेध नोंदवण्यात आला. यावेळी पिंपरी चिंचवड अॅडव्होकेटस् असोसिएशनचे माजी अध्यक्ष अॅड. नारायण रसाळ, अॅड. सुनील कडुस्कर, व अॅड. मामा खरात, अॅड. बी. के.कांबळे, अॅड. गजेन्द्र तायडे, अॅड. योगेश थांबा, अॅड.संगिता कुशाळकर, अॅड.सविता तोडकर, अॅड. पुनम शर्मा, अॅड.संगिता तोडकर,ज्येष्ठ विधीज्ञ अॅड. काका काळभोर,अॅड. लाळगे पाटील आदींनी निषेध व्यक्त केला. तसेच सर्व वकील बांधवांच्यावतीने भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सदरचा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा आणि आरोपींना फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी व लवकरात लवकर वकील संरक्षण कायदा पारित करावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी महिला अध्यक्षा अॅड. प्रमिला गाडे, उपाध्यक्ष अॅड. गोरख कुंभार, सचिव अॅड. अक्षय केदार, अॅड. ऑडिटर अॅड. संतोषी काळभोर, सदस्य अॅड. जयेश वाघचौरे,अॅड. तेजस चवरे, अॅड. विशाल पौळ, अॅड. साक्षी धुमाळ, अॅड. गीतवली जाधव, अॅड. निलम जाधव, तसेच अॅड. प्रविण जाधव,अॅड. सागर पोवार, अॅड.रोहीत भोसले, अॅड.विनोद आढाव आदी उपस्थित होते.



# पुणे विद्यापीठाच्या हिवाळी सत्र परीक्षा २२ ऑक्टोबरपासून सुरु होणार

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व विद्याशाखांमधील सर्व अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २२ ऑक्टोबरपासून पारंपारिक पद्धतीने सुरू होणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदविका, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नियमित व अनुशेषित विद्यार्थ्यांच्या लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन टप्प्या-टप्प्याने करण्यात आले आहे.



विद्यापीठाच्या अधिकार मंडळांनी घेतलेल्या निर्णयानुसार हिवाळी सत्राच्या (ऑक्टोबर-नोव्हेंबर) परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधित परीक्षांची वेळापत्रके विद्यापीठाच्या '्.ीपिळींपिश.रल.ळप' या संकेतस्थळावर टप्प्याटप्प्याने प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळोवेळी संकेतस्थळावरून माहिती घ्यावी, अशी सूचना विद्यापीठ प्रशासनाने केली आहे.

सर्व विद्याशाखेतील पदविका अभ्यासक्रम, पारंपारिक अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष पदवी (कला, वाणिज्य व विज्ञान), विधी अभ्यासक्रमामधील प्रथम वर्ष पदवी (एलएलबी/बीएएलएलबी) या परीक्षांचे आयोजन महाविद्यालय स्तरावर करण्यात यावे. य परीक्षांचे वेळापत्रक आणि प्रश्नपत्रिका तयार करणे, प्रत्यक्ष परीक्षांचे आयोजन करणे, उत्तरपत्रिका तपासणे, विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या संरक्षित अंतर्गत प्रणालीमध्ये गुण भरणे, ही सर्व कामे महाविद्यालय स्तरावर करण्यात यावीत, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे. पारंपारिक अभ्यासक्रमातील कला, वाणिज्य आणि विज्ञान प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम वगळून, तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांची सर्व वर्ष, व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व वर्षांच्या परीक्षांचे आयोजन विद्यापीठ स्तरावरून करण्यात येईल. तसेच हिवाळी सत्रातील जुन्या नियमित आणि बहि:स्थ अभ्यासक्रमांच्या परीक्षा या समकक्ष विषयानुसार आयोजित केल्या आहेत. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अभ्यासक्रमांतर्गत जाहीर केलेले समकक्ष विषयांची समग्र माहिती घेऊन त्याप्रमाणे परीक्षा द्यावी, असे डॉ. काकडे यांनी परिपत्रकाद्वारे नमूद केले आहे.

# इंदापूर बाजार समितीच्या सभापतीपदी तुषार जाधव

**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी तुषार जाधव यांची तर उपसभापतीपदी मनोहर ढोके यांची बिनविरोध निवड गुरुवार, दि.३ रोजी करण्यात आली. इंदापूर बाजार समिती नुतन संचालक मंडळाची निवड दि. २९ एप्रिल २०२३ रोजी झाली. त्यावेळी ज्येष्ठ संचालक विलासराव माने यांची सभापती व रोहित मोहोळकर यांची उपसभापती म्हणून निवड करण्यात आली होती. त्यांनी राजीनामा दिल्यानंतर नवीन सभापती उपसभापती यांची निवड घेण्यात आली.



यावेळी बाजार समितीचे माजी सभापती व मार्गदर्शक जिल्हा बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे म्हणाले, बाजार समितीने सभापती व उपसभापती यांनी सर्व संचालक मंडळ यांना विश्वासात घेऊन बाजार समितीचे मुख्य व उपबाजाराच्या ठिकाणी शेतकरीभिमुख आधुनिक सुविधांची उभारणी करून बाजार समितीचा नावलौकिक वाढवला.

शिवाय बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ होऊन बाजार समितीची उलाढाल उच्चांकी ३५० कोटी रुपयांच्या पुढे गेली मोहोळचे आमदार यशवंत माने व बाजार समितीचे मार्गदर्शक अप्पासाहेब जगदाळे यांचे व नूतन सभापती व उपसभापती, मावळते सभापती व उपसभापती यांच्या कामकाजाचे कौतुक केले. तसेच सर्व संचालक मंडळ यांच्याशी विचार विनिमय करून वि.का. सोसायटी, ग्रामपंचायत, दूध संस्था, पतसंस्था व शैक्षणिक संस्थामध्ये आणि बाजार समितीचे संचालक म्हणून अतिशय अल्पावधीत शेतकऱ्यांशी नाळ जोडून सर्व सर्वसामान्यांच्या विकासाकरीता व हितासाठी कार्यरत असलेले उमदे युवा कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्व तुषार जाधव यांची बाजार समितीच्या सभापतीपदी निवडीची घोषणा केली.

त्याची संचालक दत्तात्रय फडतरे यांनी सूचना मांडली व त्यास विलासराव माने यांनी अनुमोदन दिले. तसेच साधी राहणी व उच्च विचारसरणी असणारे ज्येष्ठ संचालक मनोहर ढुके यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाली.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक, एस. एस. कदम यांनी कामकाज पाहिले. निवडीनंतर आप्पासाहेब जगदाळे,आमदार यशवंतराव माने, प्रवीण माने, अॅड तेजसिंह पाटील, अंकुश जाधव, अॅड राहुल मखरे, देवराज जाधव, कांतीलाल झगडे, सागर मिसाळ, मुंकुद शहा, विजय शिंदे, कालिदास देवकर,बापू जामदार, छाया पडळकर, चित्तरंजन पाटील, प्रतापराव पालवे, अमर जगदाळे, संतोष वाबळे, गणेशकुमार झगडे, अमोल भोईटे तसेच बाजार समितीचे संचालक विलासराव माने, रोहीत मोहोळकर, दत्तात्रय फडतरे, मधुकर भरणे, संग्रामसिंह निंबाळकर, संदीप पाटील, रुपाली संतोष वाबळे, आबा देवकाते, संतोष गायकवाड, अनिल बागल, दशरथ पोळ, रोनक बोरा, सुभाष दिवसे, प्रभारी सचिव संतोष देवकर व विविध संस्थाचे पदाधिकारी, शेतकरी, आडते-व्यापारी, हमाल-मापाडी उपस्थित होते.

# संविधान भवनाच्या उभारणीसाठी १२० कोटी रुपयांची निविदा,आमदार लांडगे यांच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप

**पिंपरी । प्रतिनिधी**

जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश भारतीय लोकशाहीचा पाया संविधान अर्थात राज्यघटना आहे. या राज्यघटनेचा प्रचार, प्रसार आणि जनजागृती व्हावी. या करिता देशातील पहिले संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये उभारले जात आहे. त्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने सुमारे १२० कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात केली असून, निविदा प्रसिद्ध केली आहे.





भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (झचठऊ-) च्या पेठ क्रमांक ११ मध्ये संविधान भवन व विपश्यना केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यासाठी पीएमआरडीएकडून संबंधित जागा महानगरपालिका प्रशासनाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे.

दरम्यान, महानगरपालिका अंदाजपत्रक समितीच्या माध्यमातून पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील निविदा प्रक्रियेला मंजुरी दिली आहे. पहिल्या टप्प्याची ई-निविदा दोन कोटी ५३ लाख २५ हजार ४०७ आणि दुसऱ्या टप्प्यातील सुमारे ११७ कोटी अशी एकूण ११९ कोटी ७१ लाख ३५ हजार ३२६ रुपयांची निविदा प्रक्रिया राबवण्यात येत आहे.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, २०१९ मध्ये पिंपरी-चिंचवड नवनगर प्राधिकरणाच्या माध्यमातून संविधान भवन उभारणीसाठी पाठपुरावा सुरू केला. त्यानंतर 'पीसीएनटीडीए'चे विलिनीकरण पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरणामध्ये करण्यात आले. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात सदर प्रकल्प लांबणीवर पडला. महायुतीची सत्ता आल्यानंतर २०२२ मध्ये पुन्हा या कामाला गती देण्यात आली. प्रस्तावित जागा 'पीएमआरडीए'कडून महानरपालिकेकडे हस्तांतरित करण्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडेही आम्ही पाठपुरावा केला. आता संविधान भवन उभारणीसाठी निविदा प्रसिद्ध झाली आहे. त्यामुळे एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण होत आहे. पुढे ते म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होवून शहरात संविधान तथा राज्य घटनेचा प्रचार, प्रसार व्हावा. यासह जगभरातील लोकशाही देशाच्या घटनांचा अभ्यास करता यावा, असा संकल्प आहे. संविधान जागृती आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची लायब्ररी उभारण्याच्या कामाला गती द्यावी, अशी सूचना महापालिका प्रशासनाला केली होती. संविधान भवन पिंपरी-चिंचवडमध्ये साकारले जात आहे, ही आम्हा पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे.

# शाळेत तिसरीच्या मुलीवर अत्याचार; खराडी भागातील घटना

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात अल्पवयीन मुलींवर अत्याचाराच्या घटना वाढीस लागल्या आहेत. वानवडी भागातील शाळकरी मुलींशी व्हॅनचालकाने अश्लील कृत्य केल्याची घटना ताजी असतानाच खराडी भागातील एका शाळेत इयत्ता तिसरीतील मुलीवर अत्याचार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी चंदननगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खराडी भागातील एका शाळेत पीडित मुलगी तिसरीत आहे. १ ऑक्टोबर रोजी मुलीची आई तिला घरात चांगल्या आणि वाईट स्पर्शाबाबत (गुड टच आणि बॅड टच) माहिती देत होती. त्यावेळी मुलीने शाळेतील संजय सर नावाच्या एका व्यक्तीने प्रसाधनगृहाच्या बाहेर वाईट पद्धतीने स्पर्श केल्याचे मुलीने आईला सांगितले. केल्याचे आईला सांगितले. त्यानंतर आई ३ ऑक्टोबर रोजी शाळेत गेली. तिने मुख्याध्यापिकेला याबाबत विचारले. त्यांनी देखील घटनेचे गांभीर्य ओळखून त्वरीत पोलिसांच्या दामिनी पथकाला याबाबतची माहिती दिली. पोलिसांनी त्वरीत गुन्हा दाखल करून घेत आरोपीचा शोध सुरू केला आहे. मुलीला शाळेतील शिक्षकांची छायाचित्रे दाखविण्यात आली. मात्र, अश्लील कृत्य करणारी व्यक्ती दुसरी असल्याचे तिने सांगितले. पोलिसांनी शाळेतीली सीसीटीव्ही चित्रीकरण ताब्यात आहे. पोलीस उपनिरीक्षक पाटील करत आहेत.

# महिलांवरील वाढत्या अत्याराच्या घटना रोखण्यासाठी पोलीसांची गस्त वाढवावी - उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात घडत असलेल्या महिलांवरील अत्याचार, लहान मुलांचे लैंगिक शोषण या घटनांमुळे पोलिस विभागाने अधिक सतर्क राहून, अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी पोलीसांची गस्त वाढवावी. शाळांमध्ये 'बॅड टच गुड टच' उपक्रम राबवून मुले आणि पालकांमध्ये जनजागृती करावी. निर्जन स्थळी पोलिस चौकी अद्ययावत आणि सीसीटीव्ही बसवून तेथील हालचालींवर देखरेख व्हावी, अशा सूचना दिल्याचे विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पोलिस आयुक्त कार्यालयात आयोजीत पत्रकार परिषदेत सांगितले. पोलीस आयुक्त कार्यालयात डॉ. गोऱ्हे यांनी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यानंतर त्या बोलत होत्या. पुणे शहर आणि परिसरात महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना चिंताजनक असून पोलीसांनी आरोपींना पकडून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी. त्यात कोणालाही दया दाखवू नका, अशा सक्त सूचना देत, बोपदेव घाट, दिवे घाट, वेताळ टेकडी, एनडीए परिसर यासह अन्य निर्जन स्थळी नागरिकांच्या संरक्षणासाठी गस्त वाढवावी. निर्जन स्थळी पोलीस चौकी अद्यावत करावी आणि रात्रीच्या वेळी प्रभावशील प्रकाश झोताची आणि भोंग्यांची व्यवस्था करावी. याठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावे.




गेल्या काही वर्षात तात्काळ पैसा कमावण्याच्या मोहापाई गुन्हेगारी वाढत असल्याचे दिसून येते. त्यावर वचक ठेवावी. महिला दक्षता समित्यांच्या बैठकांमधून फलनिष्पती काय झाली, तक्रारींचा निपटारा कसा केला याबाबतचा कृती अहवाल दक्षता समितीमधील महिला सदस्यांना द्यावा. यामुळे गुन्हेगारी नियंत्रणात येवू शकते. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विविध कक्ष स्थापन करण्याच्या सूचना आहेत. त्यानुसार ज्येष्ठ नागरिक कक्ष, जात पंचायत निमुर्लन कक्ष, अंध श्रद्धा निमुर्लन कक्ष तसेच मानवी तस्करी संदर्भातील कक्ष स्थापन होणे आवश्यक आहे. काही ठिकाणी घरातील व्यक्तिंकडूनच महिलांवर आणि मुलींवर अत्याचार होताना दिसत आहेत. अशा वेळी नातेवाईकांनी पुढे येवून पोलीसांकडे तक्रार देणे आवश्यक आहे. सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या अत्याचारामध्ये शाळा, महाविद्यालयाच्या तसेच स्कुल बसचे वाहनचालक आणि वाहक यांची चारित्र्य पडताळणी होणे आवश्यक आहे. शाळांमध्ये गांभीर्यपूर्वक 'बॅड टच गुड टच' याची कार्यशाळा आणि मार्गदर्शन व्हावे. शहरात नवीन पोलीस ठाणे वाढविण्याबाबत शासन सकारात्मक असून त्यादृष्टिने प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी सांगितली.